# संस्कृत नाटके

डॉ. प्रशांत बिरादार

- **संस्कृत नाटके**
  **Sanskrit Natake**

- September 2019


- लेखक– डॉ. प्रशांत बी. बिरादार
  महात्मा फुले महाविद्यालय,
  अहमदपूर. जि. लातूर
  मोबाईल नं. 9764120822



- ई प्रकाशक– प्रा. डॉ. शशिकांत दरगु
  नंदी फांऊडेशन, नांदेड
  मोबाईल नं. 9405773134

- प्रथमावृती–

- मूल्य –75

- ISBN NO.- 978-81-939485-3-8



- सर्वाधिकार – लेखकाधीन

© या पुस्तकातील काही भाग किंवा मजकूर लेखकाच्या परवानगीशिवाय संदर्भासाठी वापरू नये.

DO NOT COPY

## अनुक्रमणिका


| अक | नाटके | पृ. |
|---|---|---|
| 1 | कर्णभारम्– भास | 5–7 |
| 2 | स्वप्नवासवदत्तम्– भास | 8–19 |
| 3 | मालविकाग्निमित्रम–कालिदास | 20–26 |
| 4 | विक्रमोर्वशीयम्–कालिदास | 27–30 |
| 5 | अभिज्ञानशाकुन्तलम –कालिदास | 31–39 |
| 6 | मृच्छकटिकम्–शूद्रक | 40–45 |
| 7 | मुद्राराक्षसम्– विशाखादत्तम् | 46–50 |
| 8 | वेणीसंहार– भट्टनारायण | 51–54 |
| 9 | रत्नावली– हर्षवर्धन | 55–58 |
| 10 | मालतिमाधवम्–भवभूति | 59–62 |
| 11 | महावीरचरितम्–भवभूति | 63–65 |
| 12 | उत्तररामचरितम्–भवभूति | 66–69 |
| 13 | नाट्यशास्त्रीय परिभाषा | 70–75 |


- नाटककांराचा परिचय–
- नाटकांचा परिचय–
- कथावस्तू–
- पात्रपरिचय–
- नाट्यशास्त्रीय परिभाषा–

DO NOT COPY

# मनोगत

संस्कृतमधील प्रसिद्ध नाटककारांचा परिचय व त्यांची नाटके मराठी भाषेमध्ये सहज वाचता यावी यासाठी हा अल्पप्रयत्न करण्यात आला आहे. 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड' येथे बी.ए. च्या अभ्यासक्रमामध्ये काही नाटकांचा समावेश आहे. तेव्हा संस्कृतच्या व इतर वाचकांनाही संस्कृत नाटककार व त्यांच्या नाटकाचा परिचय मराठीभाषेमध्ये या पुस्तकाच्या माध्यमाने होऊ शकतो.

या पुस्तकात नाटकाच्या कथानकला संक्षीप्त करण्यात त्याची गोडी जाऊ नये याची पूर्ण काळजी घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच नाटककारांचा अल्पपरिचय, त्यातील महत्वाच्या पात्रांचा परिचय व नाट्यशास्त्रीय परिभाषा स्पष्ट करण्यात आल्या आहेत. परीक्षेसोबतच आपल्या साहित्यातील ज्ञानवर्धनासाठी याचा उपयोग होईल अशी अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांची गरज, मोठ्यांची प्रेरणा आणि मित्रांच्या सहकार्यानं हे पुस्तक प्रकाशित करत आहे. यातील राहिलेल्या उणिवा दाखवून दिल्यास त्या नंतर नक्कीच दूर करण्यात येतील.

पुस्तक लिहण्यास प्रेरणा असणारे आमच्या किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. प्रा. विजयकुमार बाबाराव पाटील साहेब, सचिव मा. ज्ञानदेव रामभाऊ झोडगे साहेब, सर्व सन्माननीय सदस्य व महात्मा फुले महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांचा मी ऋणी आहे. तसेच माझे सर्व सहकारी, पुस्तक लिहण्यास व नंदी फांऊडेशन मध्ये प्रकाशित करण्यास मदत करणारे माझे मित्र प्रा. डॉ. शशिकांत दरगु व सर्व संस्कृतचे प्राध्यापक यांचे सादर आभार.

प्रा. डॉ. प्रशांत बिरादार

DO NOT COPY

## कर्णभारम् – भास

**भासाचा अल्पपरिचय–**

संस्कृत नाटकारांपैकी एक महान नाटककार म्हणून भासाची ओळख आहे. प्राचीन कविमधील कालिदास, बाणभट्ट, वाक्पतिराज राजशेखर आणि जयदेव यांनी भासांचे आदराने स्मरण केले आहे. यावरून ते कालिदासाच्या पूर्ववर्ती व अश्वघोषाचे उत्तरवर्ती मानले जातात. त्यांचा काळ विविध तर्क व मतमतांतरानुसार इ.स. 300 च्या आसपासचा मानला जातो.

1912 पूर्वी भासाचा केवळ नामोल्लेखच होता. त्यांच्या सर्व रचना अप्राप्त होत्या. इ.स. 1912 मध्ये केरळमधील संस्कृत विद्वान श्री. टी.गणपतीशास्त्री यांनी त्यांची 13 नाटके तामीळ पांडुलिपीमध्ये प्राप्त केली. 1913 मध्ये भासनाटकचक्र नावाने ही नाटके प्रसिद्ध झाली. विषयवस्तुच्या दृष्टीने भासाची 13 नाटके तीन प्रकारे विभाजित केली जातात.

1) **लोककथाश्रित नाटके–** स्वप्नवासवदत्तम्, प्रतिज्ञायौगंधरायणम्, अविमारकम् व दरिद्रचारूदत्तम्

2) **रामायणाश्रित नाटके–** प्रतिमा व अभिषेकम्

3) **महाभारताश्रित नाटके–**मध्यमव्यायोग, पंचरात्रम्, दूतवाक्यम्, दूतघटोत्कचम्, कर्णभारम् व उरूभंगम्

**कर्णभारम् नाटकाचा परिचय–**

हे महाभारताश्रित नाटक आहे यामध्ये एकच अंक असून दशरूपकातील व्यायोग या नाट्यप्रकारात याचा समावेश होतो. यात इंद्र आणि कर्ण हे दोनच महत्वाचे पात्र असून नाटकाचा नायक कर्ण आहे. मुख्य अंगीरस वीर रस असून करूण रसाचा ही योग्य परिपाक यात झालेला आहे.

**कथावस्तू–**

नाटकाच्या सुरवातीला कर्णाला सूचना मिळते की युद्धाच्या सेनापतित्वाचा भार कर्णावर आलेला आहे. कर्ण आपला सारथी शल्य याला घेऊन युद्धासाठी तयार होतो. आपला रथ अर्जुनाकडे घेऊन जाण्याचा आदेश देतो. दरम्यान शल्याला परशुरामापासून मिळालेल्या शस्त्राचा वृतांत सांगतो. त्यानुसार परशुराम क्षत्रियांना विद्या शिकवत नसल्याने

DO NOT COPY

आपण ब्राह्मण असल्याचे खोटे सांगून कर्णाने जमदग्निपुत्र परशुरामाकडून शस्त्रविद्या शिकली होती.

एकदा कुश, संमिधा इत्यादी आणण्यासाठी वनात गेल्यानंतर गुरू परशुरामाला झोप लागली. ते कर्णाच्या मांडीवर डोकं ठेऊन झोपले असताना एका किड्याने कर्णाच्या मांडीला कुरतडायला चालु केले. असह्य वेदना होत असतानाही गुरू उठतील या भितीने कर्णाने त्या वेदना सहन केल्या. पण रक्ताच्या गर्मीने गुरू जागी झाले. त्यांनी तो सर्व प्रकार पाहिला. अशा वेदना केवळ क्षत्रियच सहन करू शकतो हे समजून त्यांनी कर्णाला वास्तव विचारले. कर्णाचे क्षत्रियत्व उघडे पडल्यावर संकटकाळी मी शिकवलेली विद्या व्यर्थ ठरेल असा शाप गुरू परशुरामाने कर्णाला दिला.

असा वृतांत सांगून झाल्यावर पडद्यामागून भिक्षा मागणा—या ब्राह्मणाचा आवाज आला. ब्राह्मण वेषात आलेल्या इंद्राने कर्णाला भिक्षा मागितली. कर्णाने धन, वस्त्र, दागिने, राज्य इत्यादी सर्व देऊ केले पण ब्राह्मण ते सर्व स्विकारण्यास तयार नव्हता. शेवटी ब्राह्मण वेषातील इंद्राला ओळखून कर्णाने आपले कवच कुंडल इंद्राला दान केले.

---

## पात्र परिचय

## कर्ण

कर्णभारमध्ये भासाने कर्णाला नायकाच्या रूपामध्ये चित्रीत केले आहे. कर्ण अंगदेशाचा राजा आहे. तो एक सहृय, शूर व दानी योद्धा आहे. कर्णाच्या चरित्राची महती विशेषता त्याची अपूर्व ब्राह्मणनिष्ठा व दानशीलता आहे. तो ब्राह्मणासाठी सर्वस्व दान करायला उद्युक्त असतो. जेव्हा इंद्र स्वर्ण, गायी घेण्यास तयार नसतो तेव्हा तो आपले डोके द्यायलाही तयार असतो. त्याचा असा विश्वास आहे की मरणानतंर यश स्थिर राहते.

जेव्हा शल्य कर्णाला कवच कुंडल इंद्राला न देण्यास सांगतो तेव्हा तो म्हणतो की वेळ आल्यावर उपार्जित विद्याही नष्ट होते आणि मजबूत मुळा असणारे वृक्षही पडतात, पाणीही सरोवरामध्ये जाऊन सुखून जाते. पण जो पदार्थ हवन केला असेल किंवा दानामध्ये दिला असेल तो जसाच्या तसाच राहतो.

कर्णाला भारतीय संस्कृती आणि आदर्शाबद्दल अगाध श्रद्धा आहे. तो राजा आहे आणि सोबतच वीर योद्धाही आहे. तो राजाच्या परम कर्तव्याला जाणतो. त्याच्यात करूणा खूप

DO NOT COPY

आहे. तो म्हणतो मी जरी राधेय असलो तरी कुन्तीचाच पुत्र आहे. त्यामुळे युधिष्ठिरादी माझे बंधू आहेत त्यांच्यावर प्रहार कसा करता येतो.

तो दान करताना त्याच्या प्रतिफळाची अपेक्षा करत नाही. जेव्हा इंद्राव्दारा पाठवलेला देवदूत कर्णाला कवच कुंडलाच्या बदल्यात विमला शक्ती द्यायला तयार असतो तेव्हा तो ती घेत नाही. पण ब्राह्मणाच्या वचनाला उपेक्षित करता येत नसल्याने ती शक्ती घेतो. अशाप्रकारे त्याग व गौरवाने युक्त कर्णाचे चरित्र भासाने चित्रित केले आहे.

## इंद्र / शक्र

कर्णभारम् नाटकातील दुसरे महत्वाचे पात्र म्हणजे देवराज इंद्र होय. याला शक्रही म्हटले जाते. हा वेदातील मुख्य देवता आहे. कर्णभारम् नाटकात शक्र नावाच्या ब्राह्मणाचा वेश बदलून कर्णाचे कवच कुंडल मागण्यासाठी प्रकट होतो. त्याचे स्वार्थी रूप कर्णभारम् नाटकात सुरवातीला पाहायला मिळते. तो आपले स्वार्थ साधण्यात तत्पर आहे. स्वतःच्या मुलाला अर्जुनाला विजय मिळावा यासाठी तो कर्णाकडून कवचकुंडल तर घेतो पण नंतर त्याला आपल्या छळ आणि कपटी व्यवहाराचा पश्चाताप होतो. आत्मग्लानिमुळे तो देवदूतामार्फत विमलाशक्ती नावाचे अस्त्र कर्णासाठी पाठवतो ज्यामुळे त्याला कोणत्याही एका पांडवाला अचूकपणे मारता येते. यामुळे इंद्राचे चरित्र नंतर उदात्त वाटू लागते. भासाने इंद्राला प्राकृत भाषा बोलताना दाखवले आहे. तसे तर संस्कृत नाटकात ब्राह्मण पात्र केंवळ संस्कृतच बोलतात.

---

●●●

DO NOT COPY

## स्वप्नवासवदत्तम् – भास

### नाटकाचा परिचय–

हे नाटक उदयन कथेवर आाश्रित आहे. भासाच्या तेरा नाटकापैकी सर्वात उत्तम नाटक म्हणून या नाटकाची ख्याती आहे. हे घटना प्रधान नाटक असून यात सहा अंक आहेत. नाटकाच्या पाचव्या अंकात राजा उदयन व वासवदत्ता यांच्या स्वप्नमिलनाचा प्रसंग अत्यंत महत्वाचा असल्याने नाटकाचे नाव त्यावरून स्वप्नवासवदत्तम् पडले.

### कथावस्तू–

नाटकाच्या सुरवातीला बलरामाचे स्तवन करण्यात आले आहे. मगध राजकुमारी पद्मावती तिची माता महादेवी हिला भेटण्यासाठी तपोवनात येत असते. तेथे अवन्तिकेच्या वेषात महाराणी वासवदत्ता व परिव्राजक म्हणजे संन्यासी वेषात उदयनाचा मंत्री यौगंधरायण आलेले असतात. त्यांना पद्मावतीच्या सैनिकाकडून सर्वसामान्य रूक्ष वागणूक मिळते. पद्मावतीने धर्मार्थ काहीही मागण्याची संधी देताच यौगंधरायण महाराणी वासवदत्तेला आपली बहीण व पती परगावी गेलेली प्रोषितभर्तृदारिका असल्याचे सांगून तिला राजकुमारी पद्मावतीने आपल्या जवळ ठेवून घ्यावे अशी विनंती करतो. पद्मावतीने त्याची विनंती मान्य करते. एवढ्यात लावाणक नावाच्या गावाहून एक ब्रह्मचारी येतो. तो सांगतो की उदयन शिकारीला गेला असताना गावाला आग लागली त्यात उदयनाची पत्नी वासवदत्ता व तिला वाचवणारा यौगंधरायण जळून मरण पावला. त्यानंतर उदयनाने खूप विलाप केला. ब्रह्मचा–याच्या वृतान्तातून आपण पसरावलेली बातमी योग्य असल्याची खात्री यौगंधरायणाला होते. नंतर तो पूढील कार्यासाठी निघून जातो. येथे प्रथम अंक संपतो.

व्दितीय अंकात राजकुमारी पद्मावती आपल्या सख्यासह कन्दुकक्रिडा म्हणजे चेंडू खेळत असते ज्यात वासवदत्ताही अवन्तिकेच्या वेषात असते. ती पद्मावतीच्या मनात कोणाविषयी अभिलाषा आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न करते. बोलण्या बोलण्यातून तिला समजते की पद्मावतीही आपला पती असलेल्या उदयनावरच प्रेम करते. वासववदत्तेची भावविवशता वर्णन करताना निरोप येतो की राजकुमारी पद्मावतीची सोयरिक महाराज दर्शकाने राजा उदयनाशी केली आहे. या बातमी वासवदत्तेचे हृदय सुन्न पडते.

तृतीय अंकात राजा उदयनाचा पद्मावतीशी विवाह सोहळा चालू असतो. वासवदत्ता मात्र आपला पती परका झाला म्हणून उदास अन्तःकरणाने प्रमदवनात एकटीच बसलेली असते. तिला शोधत आलेली चेटी नावाची दासी सवत बनणा—या पद्मावतीच्या विवाहाची कौतुकमाला बनवायला सांगते. वासवदत्तेच्या दुखात आणखी भर पडते. ती सौभाग्यवती होणारी वनस्पती माळेत गुंफते पण चालाखीने सवत मारणारी औषधी त्यात गुंफत नाही. पद्मावतीच्या विवाहाने अंक संपतो.

चतुर्थ अंकात प्रमदवनात आलेल्या अवन्तिका वेषातील वासवदत्ता व नवविवाहिता पद्मावती या दोघीमध्ये अप्रत्यक्ष उदयन प्रेमाविषयी चढाओढी लागते. पद्मावतीपेक्षा वासवदत्तेने परिवाराला सोडून पळून येऊन विवाह केल्याने तीच सरस असल्याची वकालात अवन्तिका करते. तेवढ्यात राजा व विदूषक वसंतक तेथे येतात. त्यांना पाहून त्या सर्वजण लतामंडपात लपतात. त्यांना राजा व विदूषकाचे सर्व बोलणे ऐकू येते. विदूषक राजाला वासवदत्ता व पद्मावतीपैकी कोण प्रिय असल्याचे विचारतो. राजा टाळाटाळ करतो पण त्याच्या हट्टामुळे तो मजबूर होऊन सांगतो की त्याला मरण पावलेली वासवदत्ताच प्रिय आहे. पण समोर आलेल्या पद्मावतीपासून ही गोष्ट तो बहाण्याने लपवू पाहतो. या अंकातून उदयन व वासवदत्तेच्या उत्कट प्रेमाची प्रतीती करून देण्यात आली आहे.

पाचव्या अंकाच्या सुरवातीला पद्मावतीच्या शीर्षवेदनेची बातमी संपूर्ण रातवाड्यात पसरत असते. तिला पाहण्यासाठी म्हणून राजा व विदूषक समुद्रगृहात (तळगृहात) जातात. तिथे अद्याप पद्मावती आली नसल्याचे पाहून तिच्या अंथरणावर राजा पहुडतो. त्याला झोप लागल्याचे पाहून विदूषक चादर आणण्यासाठी जातो. तेवढ्यात अवन्तिका वेषातील वासवदत्ता तिथे पद्मावतीला पाहण्यासाठी येते. तेथे कमी प्रकाश असल्याने झोपलेल्या राजाला पद्मावती समजून त्याजवळ बसते. तेवढ्यात राजा स्वप्नात तिच्याशी बोलायला लागतो. ती दचकून उठते पण कोणीही नसल्याचे पाहून त्याला प्रतिसाद देते. जाता जाता त्याचा लटकत असलेला हात पलंगावर ठेवते व निघून जाते. तिच्या स्पर्शाने उठलेला राजा तिच्या मागे पळायला जाऊन दरवाज्याशी धडकून जमिनीवर पडतो. त्याला लक्षात येत नाही ते स्वप्न होते की वास्तव.



DO NOT COPY

सहाव्या अंकात राजा पद्मावतीचा भाऊ दर्शक याच्या सैन्याच्या मदतीने आपले राज्य शत्रू आरूणीकडून वापस जिंकलेला असतो. त्याला भेटण्यासाठी उज्जयिनीहून वासवदत्ताची दाई व मंत्री कांचुकी आलेले असतात. ते आपल्या सोबत उदयन व वासवदत्तेच्या विवाहाची प्रतिमा फोटो आणले होते. ती प्रतिमा पाहून गोंधळलेली पद्मावती वासवदत्तेसारखी हुबेहुब दिसणारी आपली सखी अवन्तिका राजासमोर प्रस्तूत करते. तिला पाहताच दायी व राजा तिला ओळखतात. तेवढ्यात सन्याशी वेषातील मंत्री यौगंधरायणही तेथे येतो. वासवदत्ता व यौगंधरायण हे सर्व राजाला पून्हा राज्य मिळण्यासाठीच केले असल्याचे सांगून माफी मागतात. राजा आनंदाने त्यांना माफ करून सुखद बातमी देण्यासाठी सर्वजण उज्जयिनीला निघतात. भरतवाक्याने नाटक सपंतो.

---

**पात्र परिचय–**

**उदयन**

**नायक–**

उदयन हा स्वप्नवासवदत्तम् या नाटकाचा नायक आहे. तो अत्यंत उच्च कुळामध्ये जन्मला आहे. 'भारतानां कुले जातः।' तो वत्सदेशाचा राजा होता. त्याचे राज्य आरूणी नावाच्या शत्रूने हरण केले होते. त्याच्या प्राप्तीसाठी त्याची प्राणापेक्षाही प्रिय असणारी वासवदत्ता नावाची पत्नीही त्याच्यापासून दूर होते. नाटकाच्या शेवटी नाट्यशास्त्रीय नियमानुसार त्याला पत्नी व राज्य हे फळ प्राप्त होते. तो धिरललित कोटीतील नायक आहे.

**रूपवान –**

उदयन दिसायला खूप सुंदर होता असे नाटकात वर्णन आले आहे. राजकुमारी पद्मावती त्याला न पाहताच त्याच्या गुण संकिर्तनाने त्याच्यावर अनुरक्त होते. ज्यावेळी तिची दासी प्रश्न करते की जर तो विद्रुप असेल तर त्यावेळी अवन्तिका वेषधारी वासवदत्ता तात्काळ म्हणते नाही नाही तो सुंदर आहे. 'नहि नहि दर्शनीय एव।' त्याच्या वय, ज्ञान, कुळ यासोबत सुंदर रूपाला पाहून दर्शकाने आपली बहीण दिली होती.



DO NOT COPY

**गुणवान –**

उदयन रूपासोबतच गुणवान राजा आहे. प्रथमांकात आलेला ब्रह्मचारी त्याचे गुण गातो. तेव्हा तापसी म्हणते 'स खलु गुणवान् नाम राजा यः आगुन्तेकेनाप्यनेनैव प्रशस्यते।' ज्या गुणामुळे वासवदत्ता त्याच्यावर केवळ अनुरक्तच नव्हे तर वेडावून गेली होती तो त्याचा गुण म्हणजे सानुक्रोशत्व अर्थात अनुकंपा व प्रेमळपणा होय. त्याच अशाच गुण किर्तीने राजकुमारी पद्मावतीही त्यावर अनुरक्त झाल होती.

**संगीतप्रेमी–**

तो संगीतामध्ये अतिशय निपूण होता. त्याची एक वीणा होती. तिचे नाव घोषवती होते. नाटकातील दोन्ही नायिकांना त्याच्याकडून वीणा वाजवायला शिकावे वाटत असे. त्याने आपली प्राणप्रिया वासवदत्ता वीणा शिकवण्याचा प्रयत्न केला होता. ती वीणा नदी किनारी वाईट अवस्थेत सापडताच तिला पाहून तो भावूक होतो. हे वीणे तू दिसलीस पण ती वासवदत्ता दिसत नाही. तो भानरहीत होऊन 'अस्निग्धासि घोषवती।' इत्यादी उद्‌गार काढतो. त्या वीणेला लगेचच दुरूस्त करायला सांगतो.

**उत्कट प्रेमी–**

राजा उदयन हा उत्कट प्रेमी आहे. तो आपली प्रिया वासवदत्ता हिला प्राणापेक्षाही जास्त प्रेम करतो. तिच्या प्रेमात मग्न असल्यानेच आरूणीने राज्य बळकावले असले तरी तो तिच्या प्रेमातून विरक्त होत नाही. तिच्या मृत्युच्या बातमीने त्याच्यावर दुःखाचा डोंगर कोसळतो. तिच्या विरहात तो सुद्धा मरायला तयार होतो. रूपाने सुंदर पद्मवतीशी विवाह लावून दिल्यावरही त्याचे वासवदत्तेमध्ये बांधलेले मन ती हरण करू शकत नसल्याचे सांगतो. 'वासवदत्ताबद्धं न तु तावन्मे मनो हरति।'

वासवदत्तेच्या विरहात त्याने खूप अश्रु गाळले होते. ती स्वप्नात भेटली की वास्तवात हे कळत नसताना तो म्हणतो की ते जर स्वप्न असेल तर मी कायम स्वप्नात असावे, ते जर भ्रम असेल तर मी कायम भ्रमात असावे. त्याच्या अशा उत्कट प्रेमामुळे वासवदत्तेलाही आपल्या कष्टाचे फळ मिळाले असे वाटते.



DO NOT COPY

**शूर व धाडसी–**

उदयन राजाच्या अंगी आवश्यक असलेल्या शूर व धाडसी गुणाचा होता. वासवदत्तेच्या प्रेम व वियोगामुळे व्याकुळ झाला असला तरी तो योग्य प्रसंगी आपली वीरता, शूरता दाखवून देतो. आरूणीवर चाल करण्याची सर्व तयारी झाल्याची सूचना मिळताच त्याने स्वतः पुढाकार घेतला. तो म्हणतो की 'उपेत्य.... तमारूणिं दारूणकर्मदक्षम्।... युधि पातयामि।'

**गुरूजनांचा आदर–**

उदयन स्वतः राजा आहे तरी त्याच्यात उदंडपणा नाही. उलट तो अतिशय विनयी आहे. तो आपल्यापेक्षा वडिलधा–यांचा मान सन्मान करतो. वासवदत्तेच्या आपत्तीत त्याचा काहीही दोष नसताना तो तिचे वडील महासेन व माता अंगारवती काय म्हणेल याची चिंता त्याला वाटू लागते. 'किं वक्ष्यतिति हृदयं परिशकिंतं मे।' त्यांचा आलेला निरोपही तो आसनावरून उठून ऐकण्याचा प्रयत्न करतो.

एकंदर विनयता, सौजन्य, रूप, वय, शूरता इत्यादी गुणांनी तो उत्कृष्ट नायकाच्या कोटीत मोजला जातो.

---

**वासवदत्ता**

स्वप्नवासवदत्तम् या भासांनी रचलेल्या नाटकाची मुख्यनायिका म्हणून वासवदत्ता ओळखली जाते. नाटकाच्या नावातच या नायिकेच्या नावाचा उल्लेख मिळतो. नाटकातील तिच्या मुख्य व अतिशय महत्वाच्या भूमिकेवरूनच तिच्या नावावरून नाटकाचे नाव पडले असावे असे वाटते. यामुळे या नाटकाला नायिकाप्रधान नाटकही म्हणता येईल.

वासवदत्ता ही भारतीय नारीची आदर्श प्रतिमा म्हणून आपल्यासमोर उभी राहते. तिचे नाटकातील व्यक्तिमत्व, तिचे पतिप्रेम, समर्पण, त्याग, सहिष्णूता, इत्यादी विविध गुणांनी तिचे व्यक्तिमत्व आपल्याला अलौकिक वाटते.



DO NOT COPY

**मुख्यनायिका :**

नाटकामध्ये दोन नायिका आहेत. एक पद्मावती व दूसरी वासवदत्ता. यापैकी वासवदत्ता ही नाटकाची मुख्य नायिका म्हणून वर्णिली गेली आहे. नाटकामध्ये सर्वाधिक काळ वासवदत्ताच रंगवली गेली आहे. ती नाटकाचा नायक उदयन याची ज्येष्ठ पत्नी आहे.

नाटकातील व्दितीय किंवा उपनायिका पद्मावती आहे. ती सुद्धा वासवदत्तेची ज्येष्ठता स्विकार करून आपण अजाणतेपणी केलेल्या चुकांची तिच्याशी माफी सहाव्या अंकात मागते.

**कुलीन :**

वासवदत्ता ही नाट्यशास्त्राच्या नियमानुसार अभिजात अर्थात कुलीन, खानदानी आहे. ती अवंती नरेश महासेनाची मुलगी आहे. अवंती राज्याची राजकुमारी आहे. तिची आई अंगारवती आहे. तिला दोन भाऊ आहेत. तिची दायी वसुंधरा नावाची आहे. तिचे बालपण उज्जयिनी राजधानीत गेले. येथेच तिचे कोशांबीचा अटक असलेला राजा उदयन याच्याशी प्रेम झाले ते दोघेही पळून जाऊन विवाहबद्ध झाले. अशाप्रकारे ती अवन्तीराजकन्या कोशांबीची महाराणी होती. अवंतिका वेषामध्ये असतानाही तिचे व्यक्तिमत्व पाहून तपोवनातील तापसी तिला 'इयमपि राजदारिकेति तर्कयामि।' अर्थात ही सुद्धा राजकुमारीच असावी असे वाटते, असे म्हणते. विवाहमाला गुंफतानाही दासी तिला 'महाकुलप्रसूता स्निग्धा निपूणा' म्हणते.

**स्वाभिमानी :**

वासवदत्ता ही अतिशय स्वाभिमानी आहे. लावाणकातून वेष बदलून पळून गेल्यावर पद्मावतीच्या राज्यातील तपोवनात ती येते. तिथे तिला पद्मावतीच्या सैनिकाव्दारा सामान्य माणसाप्रमाणे बाजूला हो अशी कोणी क्षूद्र माणसाने आज्ञा करावी याची तिला खंत वाटते. म्हणून ती म्हणते– 'तथा परिश्रमः परिखेदं नोत्पादयति यथायं परिभवः' तिला चालून आलेला शारीरिक त्रास तेवढा जाणवत नाही जेवढा की हा अपमान.

**उत्कट प्रेम :**

वासवदत्तेचे उदयनावर अतिशय उत्कट प्रेम होते. ती विवाहाच्या पूर्वीपासूनच उदयनावर प्रेम करीत होती. उज्जयिनीमध्ये उदयन अटक असतानापासून त्या दोघामध्ये प्रेम झाले होते. या प्रेमामुळेच ती आपल्या नातलगांना सोडून उदयनासोबत पळून गेली होते. चौथा अंकात पद्मावती तिच्या प्रेमावर शंका घेते तेव्हा ती स्वतःच म्हणते तिचे पद्मावतीपेक्षा अधिक प्रेम आहे.

पहिल्या अंकात ब्रह्मचारीसुद्धा त्यांच्या प्रेमाचे वर्णन करताना त्यांच्यासारखे दूसरे कोणी प्रेमी नसल्याचे म्हणतो. पतिच्या प्रेमामूळे ती जळूनसुद्धा जळाली नाही. 'भर्तृस्नेहात् सा हि दग्धाप्यदग्धा।' त्यांच्या उत्कट प्रेमाला सर्वजन स्वीकार करतात. राजा उदयन तर तिच्या प्रेमामध्ये अहोरात्र राहतो. तिच्या प्रेमाची बरोबरी कोणीही करू शकत नाही. पद्मावती रूप, शील, माधूर्यानेसूद्धा उदयनाचे वासवदत्तेमध्ये बांधलेले मन हरण करू शकत नाही. 'वासवदत्ताबद्धं न तु तावन्मे मनो हरति।' पतिवरील प्रेमामूळेच ती सर्व त्रास सहन करते.

**प्रिय शिष्या :**

वासवदत्ता ही केवळ उदयनाची प्रेमिकाच नाही तर ती त्याची पट्टराणी,दक्ष गृहिणी व प्रिय शिष्या सुद्धा आहे. त्याच्या सुखात सुख व दुःखात दुःख मानणारी, कालवेळ जाणणारी व गोड आलापांनी चित्ताचा ठाव घेणारी आहे.

ती उदयनाकडून घोषवती नावाची वीणा शिकते. वीणा शिकतानाच त्यांच्यात प्रेम होते. उदयनही तिला वीणा शिकवित असलेल्या मधूर आठवणी काढतो की, अनेकवेळा शिकवत असतानाही माझ्याकडे पाहत असणा—या तिने हातातून वीणा वाजविण्याचा कोण गळून पडला असतानाही आकाशातच वीणा वाजविण्याचे कार्य केले. 'कृतमाकाशवादितम्'

चेटी राजकुमारी पद्मावतीलाही राजाची प्रिय बनण्यासाठी वीणा शिकव अशी विनंती करायला सांगते. पद्मावतीने तशी विनंतीही करते पण राजा तिला न शिकवता वासवदत्तेच्या आठवणीमुळे केवळ गप्प बसून दीर्घ सुस्कारा सोडतो.

**कर्तव्यदक्ष :**

वासवदत्ता ही कर्तव्यदक्ष पत्नी आहे. ती केवळ उदयनाच्या प्रेमाचा आश्रय घेऊन अबला नारीवत् राहत नाही. आपला पती आपल्या प्रेमामूळे राज्यकारभारात लक्ष न



DO NOT COPY

दिल्यामूळे आरूणी शत्रूव्दारा परास्त होऊन राज्य गमावला याची तिला खंत वाटते. म्हणून ती आपल्या पतीचे राज्य परत मिळवण्यासाठी स्त्रियांना उचित न वाटणा–या षडयंत्रातही सामिल होते.

आपल्या पतीला मूळचे पद मिळावे, प्रतिष्ठा प्राप्त व्हावी व आपली प्रजा सुखी व्हावी म्हणून ती आत्मार्पण करते. यासाठी ती स्त्रियांना असह्य असा अवमान व सापत्न्यभावही मुकाट्याने सहन करते.

**हजरजबाबी :**

वासवदत्ता ही कर्तव्यदक्षतेप्रमाणेच हजरजबाबीही आहे. ती अवन्तिका वेषात असताना आपल्याकडून अनावधानाने झालेल्या चुकांना तात्काळ सांभाळून घेण्याचा प्रयत्न करते. चेटी उदयनाच्या सौंदर्यावर शंका घेताच ती अनावधानाने 'नहि नहि दर्शणीय एव' नाही नाही तो सुदंरच आहे असे म्हणते पण लगेच आपण केलेली चूक लक्षात येऊन ती हजरजबाबीपणा दाखवते व म्हणते की असे उज्जयिनीचे लोक म्हणतात. नाटकात अनेकदा तिचा हजरजबाबीपणा दिसून येतो.

**त्यागी :**

वासवदत्ता ही त्यागीची जणू मूर्ती आहे. प्रथम ती आपल्या प्रेमासाठी माहेरच्या प्रियजणांचा त्याग करते. आपल्या प्रेमामध्ये आंधळया झालेल्या पतीने राज्य गमावले म्हणून ती राज्य परत मिळवून देण्यासाठी पतीचा काही काळ त्याग करून यौगंधरायणाच्या षडयंत्रामध्ये सहभागी होते. ती आपल्या सर्व राजकीय सुखसोइचा त्याग करून, आपल्या नावाचा, पदाचा, प्रतिष्ठेचा व मानाचा त्याग करते.

**उपसंहार :**

अशाप्रकारे वासवदत्ता ही भारतीय संस्कृतीमधील पतिव्रता नारी आहे. पतीच्या सुखासाठी सर्वस्व अर्पण करणारी व शेवटी सर्व परीश्रमाचे फळ पतीच्या चरणी अर्पण करणारी आर्दश नायिका आहे.

---



DO NOT COPY

## पद्मावती

स्वप्नवासवदत्तम हे भासाचे अतिशय उत्कृष्ट नाटक आहे. यातील पात्रांचे चरित्र भासाच्या अलौकिक प्रतिभेने उदात्त, पवित्र व प्रेरणास्पद बनले आहेत. स्त्री पात्रांमध्ये आदर्शवत् गुणांचे सम्मिलन पाहावयास मिळते. त्यापैकीच एक म्हणजे पद्मावती होय. तिच्या चरित्राचे विविध पैलू निम्नपणे पाहता येतील.

**उपनायिका–**

नाटकाचा नायक उदयन, मुख्यनायिका वासवदत्ता तर उपनायिकेचा मान राजकुमारी पद्मावतीला मिळालेला आहे. ती उच्च कुळामध्ये उत्पन्न झालेली असून वासवदत्तेच्या मृत्युच्या बातमीमुळे उदयनाची व्दितीय पत्नी बनते. ती उपनायिका असली तरी तिचे नाटकातील स्थान खूप महत्वाचे आहे. ती 'मगधराजदर्शकस्य भगिनी पद्मावती नाम।' मगधाचा राजा दर्शक याची बहीण आहे. तिच्यामुळेच राजा उदयनाला आपले गमावलेले राज्य परत मिळते.

**धर्मप्रिया व पद्मावती–**

पद्मावती धर्मामध्ये विश्वास व श्रद्धा असणारी नायिका आहे. ती पहिल्या अंकात आपली माता महादेवी हिला भेटायला तपोवनात येते. तपोवनात येताच तेथील तपस्व्यांना तिर्थोदक, समिधा, फुले, फळे इत्यादी गोष्टीची विचारणा करून त्याची सोय करते. धर्मा बाधा न आणण्याचे तिच्या कुळाचे वृत आहे. म्हणून तिला 'धर्मप्रिया नृपसुता।' धर्मप्रिय असणारी राजकुमारी असे म्हटले आहे.

तसेच ती सत्यवादिनी ही आहे. कोणाला काय हवे असे म्हणताच स्वतःच्या बहिणीला तिला आश्रय मागणा–या यौगंधरायणाची मागणी स्वीकृत करून आपली सत्यवादिता व वचनबद्धता दाखवून देते.

**सुंदर व गुणानुरागी–**

ती बाल्य व तारूण्याच्या सीमेवर उभी असून कुसुमाप्रमाणे लोभनीय यौवन तिच्या शरीरावर फुलत आहे. कन्दुकक्रिडा खेळत असताना तिचे आरक्त झालेले कपोल, घर्मबिंदुंनी सुशोभित मुख व कमळाप्रमाणे लालसर व नर्म तिचे हाथ वासवदत्तेलाही मोहीत करतात. आपल्या रूपशीलमाधुर्याने ती उदयनाची बहुमता होते.



DO NOT COPY

तिला मागणी घालण्यासाठी अनेक राज्यातून दूत येतात पण ती केवळ उदयनाच्या गुणावर भाळलेल असते. उदयनाच्या गुणांची किर्ती तिने ऐकलेली होती. त्यामुळे आपले हृदय उदयनाला अर्पण करते. चेटी म्हणते की 'तस्य गुणान् भर्तृदारिका अभिलषति।'

**पतिप्रेम व मत्सरहीन–**

पद्मावतीचे आपला पती उदयन यावर असलेले प्रेम लहान सहान गोष्टीतून दिसून येते. केवळ गुणानुरागाने त्याच्यावर अनुरक्त असते. शेफालिका पुष्पांच्या मनोहर आनंदात पतीला सहभागी करून घेण्यासाठी फुले तोडू देत नाही. वासवदत्तेने पती प्रिय आहे काय असे विचारल्यावर 'आर्ये न जानामि। आर्यपुत्रेण विरहितोत्कण्ठिता भवामि।' पतीच्या विरहाने मी उत्कंठीत होते असे म्हणते.

तसेच वासवदत्तेचे उदयनावर असलेले प्रेम जाणून व ती आपली सवत असूनही तिच्याविषयी मत्सरभाव दाखवत नाही. विदूषकाच्या प्रश्नावरून राजा उदयनाने पद्मावतीपेक्षा वासवदत्ताच अधिक प्रिय असल्याने ऐकूनही राजाला दोष न देता उलट त्याला दाक्षिण्य म्हणण्याची उदारता दाखवते.

**सौजन्यशील व नववधू–**

पद्मावती रूपशीलमाधुर्याने युक्त असून हृदयाने कोमल अशी नवविवाहिता आहे. राजा चौथ्या अंकात ती नवविवाहिता असल्यानेच तिला वासवदत्तेविषयी काहीही सांगत नाही. तिचे चारित्र सौजन्याने भरलेले आहे. वासवदत्तेची सवत असून राजासोबत तिच्या नातेवाईकांना भेटते. 'वासवदत्ता स्वजनो मे स्वजन' म्हणून आदराने त्यांना संबोधते.

**विनयी–**

पद्मावतीचा स्वभाव अतिशय विनयशीय आहे. तपोवनात सर्व तपस्व्यांशी ती विनयाने वागते. आपल्या जवळ राहणारी अवन्तिकाच महाराणी वासवदत्ता असल्याचे समजताच आपल्याकडून तिला सखी समजून नकळत झालेल्या चुकीची डोके नमवून माफी मागते. 'तत् शिर्षेण प्रसादयामि।' असे म्हणते.

---



DO NOT COPY

## यौगंधरायण

स्वप्नवासवदत्तम् नाटक भास कवीव्दारा रचित आहे. संस्कृत साहित्यातील एक प्रसिद्ध नाटक म्हणून स्वप्नवासवदत्तम्‌कडे पाहीले जाते. या नाटकात सहा अंक असून हे घटनाप्रधान नाटक आहे. यातील पाचव्या अंकात नायक उदयन व नायिका वासवदत्ता यांचे स्वप्नमिलन अतिशय प्रसिद्ध आहे. यावरूनच नाटकाचे नाव स्वप्नवासवदत्तम् पडले असावे. या नाटकातील पात्र आपल्या कर्तव्याने उजळलेली आहेत. त्यापैकीच एक पात्र म्हणजे यौगंधरायण होय.

**मंत्री :**

यौगंधरायण हा राजा उदयनाचा मुख्य मंत्री आहे. उदयन हा वत्सदेशाचा नरेश असून त्याची राजधानी कोशांबी आहे. उदयनाच्या राज्याचे यशापश यौगंधरायणावर अवलंबून आहे. त्याच्याशिवाय रूमण्वान नावाचाही मंत्री आहे. उदयन हा अवंतीमध्ये कैद असताना यौगंधरायणाने मोठ्या प्रयासाने त्याला तेथून बाहेर काढले होते.

**राजनिष्ठा :**

यौगंधरायण हा उदयनाचा केवळ पदाने असणारा नामधारी मंत्री नाही तर तो राजा व राज्यावर पूर्ण निष्ठा असणारा मंत्री आहे. उदयनावर येणार–या प्रत्येक संकटाला सामोरे जाऊन त्याला त्यातून बाहेर काढायचा तो पूर्ण प्रयत्न करीत असे. अवंतीच्या कैदेतून उदयनाची सूंटका त्यानेच केली.

आपली प्रिया वासवंदत्ता हिच्या प्रेमामूळे उदयनाचे राज्य आरूणी शत्रूने हिरावून घेतले याचे त्याला वाईट वाटते. यामूळेच तो उदयनाचे राज्य परत मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असतो. पूर्ण नाटकातून त्याची राजनिष्ठा दिसून येते.

**जबाबदार :**

यौगंधरायण हा जबाबदार मंत्री आहे. तो उदयनाचे राज्य परत मिळवण्यासाठी एक षडयंत्र रचतो. त्या षडयंत्रामध्ये महाराणी वासवदत्तालाही समाविष्ट करून घेतो. लावाणकातून पळून गेल्यावर वासवदत्तेला सांभाळण्याची पूर्ण जबाबदारी तो घेतो. ती



DO NOT COPY

खचल्या ठिकाणी तिला समजावून धीर देतो. तिला पद्मावतीचे सैनिक अवमानपूर्वक हाकालतील याचे दु:ख वाटताच तो समजावतो की, परिचय नसताना देवताही अपमानीत होतात. 'एवम् अर्निज्ञातानि देवतानि अपि अवधूयन्ते । पून्हा राज्यप्राप्तीनंतर तुम्हालाही असा मान प्राप्त होईल. शेवटी षडयंत्राची जबाबदारीही तो घेतो.

**चाणाक्ष :**

यौगंधरायण हा जबाबदार व चाणाक्ष मंत्री आहे. तो मिळालेल्या संधीचा तात्काळ फायदा घेतो. पद्मावतीच्या आदेशावरून तिचा मंत्री कांचुकीय कोणाला काय हवे आहे असे विचारताच तो तात्काळ त्याचा फायदा घेवून वासवदत्तेला पद्मावतीकडे ठेवून घेण्याची मागणी करतो.

उदयनाचे राज्य परत मिळविण्यासाठी वासवदत्तेला उदयनापासून दूर करणे, लावाणक गावाला आग लावणे, वासवदत्तेला पद्मावतीकडे सोपवणे, उदयनाचा पद्मावतीशी विवाह करणे, दर्शकाशी मिळून आरूणीचा पराभव करणे व उदयनाला राज्यासह पद्मावतीच्या साक्षीने वासवदत्ता परत करणे या सर्व गोष्टीतून आपणाला यौगंधरायणाचा चाणाक्षपणा दिसून येतो.

**कृतज्ञ :**

यौगंधरायण हा उदयनाचा कृतज्ञ मंत्री आहे. तो राजाचा भक्त आहे. खरा सेवक आहे. तो आपल्या कार्याची सर्व जबाबदारी विनम्रतेने स्वीकारतो. आपले षडयंत्र उघड होताच राजा विनम्रपणे सजेची मागणी करतो.व 'स्वामिनाम भाग्यानाम् अनुगन्तारो वयम्'। व आम्ही स्वामीच्या भाग्याचे आम्ही अनुसरण करणारे आहोत.

---

●●●



DO NOT COPY

## मालविकाग्निमित्रम्– कालिदास

### महाकवि कालिदास परिचय

महाकवि कालिदास हे संस्कृत भाषेचे एक महान कवी आणि नाटककार होते. आपल्या साहित्य कृतीमुळे हे केवळ भारतातच नाही तर संपूर्ण जगात प्रसिद्ध झाले. यांच्या साहित्याचा जगातील अनेक भाषामध्ये अनुवाद झाला. यांना भारताचा शेक्सपीयर ही म्हटले गेले. त्यांचा परिचय दन्तकथा व मान्यतेवरच अवलंबून आहे.

### राजकवी –

महाकवि कालिदास एक राजकवी होते. त्यांच्या राज्याश्रयाविषयी विद्वानांमध्ये मतभेद होते. काहीजण राजा विक्रमादित्याचा राजकवी मानतात तर काहीजण राजा भोजदेव यांचा राजकवी मानतात. पण ते एक राजकवी होते हे मात्र निश्चित आहे.

### जन्मस्थळ –

कालिदासाच्या जीवनाविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही. त्यामूळे त्यांच्या विषयी अनेक दन्तकथा पसरलेल्या आहेत. त्यांच्या जन्मस्थळाविषयी विविध मते आहेत. काहीजण कालिदास या नावावरून काली देवीचा दास म्हणून त्यांना बंगालचे निवासी मानतात. कारण कालीदेवी बंगालमध्ये प्रसिद्ध आहे. मेघदूत काव्याच्या उज्जैन वर्णनावरून काहीजण त्यांना उज्जैनचे निवासी मानतात. काहीजण 'काश्मीर' निवासी तर काहीजण 'मालव' निवासी असल्याचे मानतात. अशाप्रकारे त्यांच्या जन्मस्थळाविषयी विविध मते आहेत.

### काळ –

महाकवि कालिदासाच्या काळाविषयीही मतभेद आहेत. इ.स. सहाव्या शतकात बाणभट्टाने आपल्या 'हर्षचरित' ग्रंथात कालिदासाचा उल्लेख केला आहे. यामुळे ते सहाव्या शताब्दी पूर्वी व प्रथम शताब्दी नंतर इ.स. पूर्व 150 मध्ये झाले असावेत. काहीजण त्यांना चौथ्या शतकात झाल्याचेही मानतात.

### जीवन –

ते शैव मानले जातात. त्यांची पत्नी विद्योत्तमा किंवा तिलात्तमा होती. ती एक राजकुमारी होती. महाकवि कालिदास पूर्वी मूर्ख असून राजकुमारीच्या मंत्र्याने तिचा बदला

DO NOT COPY

घेण्यासाठी मूर्ख कालिदासासोबत षडयंत्र करून तिचा विवाह लावला होता. पत्नीला कालिदास मूर्ख असल्याचे कळताच तिने त्यांना घराबाहेर काढले. कालिदासाने काली किंवा सरस्वती  देवीची उपासना केल्याने त्यांना विद्‌वत्ता प्राप्त झाली. परत घरी आल्यावर दरवाज्याची कडी वाजवताच मधून तिने विचारले की, 'अस्ति कश्चित वाग्विशेष' अर्थात तुमच्या वाणीमध्ये काही विशेष आहे का? यावरून कालिदासाने रघुवंशम्, कुमारसंभवम् व मेघदूतम् हे तीन काव्य रचले. धनाच्या लोभाने एका गणिकेने त्यांचा लंकेमध्ये खून केल्याचे मानले जाते.

**रचना–**

महाकवि कालिदासाच्या सात रचना प्रसिद्ध आहेत. त्यांच्या नावाने अनेकांनी काव्य जोडण्याचा प्रयत्न केला पण त्यांचा सातच प्रामाणिक रचना असल्याचे सिद्ध आहे. त्या म्हणजे

1. दोन गितीकाव्य – ऋतुसंहार
   मेघदूतम
2. दोन महाकाव्य – कुमारसंभवम्
   रघुवंशम्
3. नाटके – मालविकाग्निमित्रम्
   विक्रमोर्वशीयम्
   अभिज्ञानशाकुन्तलम्

महाकवि कालिदासांनी आत्मस्तुती पाप समजून स्वतः विषयी काहीही लिहिले नाही. त्यामूळे दूर्दैवाने या महान कवीचा खूप कमी परिचय मिळतो. पण त्यांच्या मेघदूत, रघुवंशम् अभिज्ञानशाकुन्तलम् इत्यादी साहित्य संपूर्ण जगात प्रसिद्ध झाले त्यामुळे ते अजरामर कवी झाले. भारतासह जगातील अनेक महापुरूषांनी त्यांची मुक्त कंठाने स्तुती केली आहे.

**नाटकाचा परिचय–**

महाकवि कालिदासाच्या सात कलाकृती प्रसिद्ध आहेत. त्यापैकी तीन नाटके असून मालविकाग्निमित्रम् हे प्रथम नाटक मानले जाते. यात पाच अंक आहेत. श्रृंगार रस प्रधान



DO NOT COPY

आहे. प्रथम कलाकृती असल्यामुळे लालित्य, माधुर्य व भावगंभीरतेचा यात अभाव दिसतो. राजमहालात चालणा–या प्रणय षडयंत्राचा हा प्रतिपादक आहे.

**कथावस्तू–**

संकटामध्ये सापडलेली विदर्भराजकुमारी मालविका अग्निमित्राची राणी धारीणीचा भाऊ वीरसेन याला एका वनामध्ये सापडते. तो तिला आपली बहीण धारीणीकडे सोपवतो. तेव्हापासून ती अंतःपुरात एका दासीप्रमाणे राहते. धारीणी तिला राजाच्या नजरेपासून लपवून ठेवते. कारण तिला भिती वाटते की तिचे अप्रतिम सौंदर्य पाहून राजा तिच्याकडे आकर्षित होईल. एकदा अंतःपुरातील राण्यांचे चित्र पाहताना दास्यामधील मालविकेला पाहून राजा तिच्याकडे आकर्षित होतो. मालविकेला राजाला भेटवण्यासाठी विदूषक प्रयत्न करतो. तिच्या नृत्यकलेच्या अभ्यासासाठी गणदासाची नियुक्ती केली जाते. गणदास व दुसरा आचार्य हरदत्त यांच्या कोण श्रेष्ठ याचा वाद लागतो. कौशिकी नावाच्या परिव्राजकेच्या सांगण्यावरून दोघांच्या शिष्यांच्या नृत्यस्पर्धेवरून श्रेष्ठत्वाचा निर्णय घ्यावयाचा असतो.

दुस–या अंकात मालविकेचे नृत्य प्रत्यक्ष पाहून राजा अग्निमित्र तिच्यावर मुग्ध होतो. तिस–या अंकात प्रमदवनातील राजा अग्निमित्र व मालविका यांच्या भेटीने तिथे आलेली लहान राणी इरावती क्रुद्ध होते. चौथ्या अंकात सूचना मिळते की याप्रकाराने क्रुद्ध झालेली राणी धारीणी मालविकेला कारागृहात टाकते. साप चावल्याच्या बहाण्याने विदूषक राणी धारीणीकडून सर्पमुद्रायुक्त अंगुठी घेतो. ती अंगुठी दाखवून मालविकेची कारागृहातून सुटका करतो.

राजा व मालविका पुन्हा एकांतात भेटताना रंगे हाथ सापडतात. शेवटच्या अंकात विदर्भातून आलेल्या दोन सेविकाव्दारा मालविकेचा खरा परिचय कळल्याने व मालविकेच्या चरणाने अशोकफुल खुलल्याने प्रसन्न झालेली राणी धारीणी वधुच्या रूपात मालविकेला राजाकडे सोपवते. अशाप्रकारे नाटकाचा सुखान्त समारोप होतो.

---



DO NOT COPY

## अग्निमित्र

नाट्यशास्त्रानुसार अग्निमित्र मालविकाग्निमित्रचा धीरोदात्त नायक आहे. त्याच्यामध्ये धीरोदात्त नायकाचे सर्व गुण दिसून येतात. नाटकामध्ये त्याला प्रामुख्याने सौंदर्यप्रेमी म्हणून चित्रित केले असले तरी त्याची वीरता, कार्यदक्षपणा, उदात्तता, विनम्रता, धीरता, संयमशीलता, कलातुरपणा इत्यादी गुणोचाही उल्लेख करण्यात आला आहे.

सौंदर्यप्रेमी—

अग्निमित्र विवाहित पुरूष आहे. त्याच्या धारिणी आणि इरावती अशा दोन राण्या आहेत. तरीही मालविकाच्या चित्राला पाहून तो तिच्यावर मोहित होतो. तिला पाहण्यासाठी व्याकूळ होतो. तिच्या सौंदर्याच्या वशीभूत होऊन तिला प्राप्त करण्यासाठी योग्य अयोग्याचा विचार न करता सर्व प्रयत्न करतो.

दक्षिण नायक—

राजा अग्निमित्र एक दक्षिण नायक आहे. राजा असूनही तो राणी इरावती व धारिणी यांच्यापासून लपून मालविकाशी प्रेम करतो. मालविकासोबत राजा बोलत असताना राणी इरावती पाहते व क्रुद्ध होऊन त्याला शठ म्हणते तरीही तो रागाला येत नाही. एवढेच नाही तर ती मारायला अंगावर येते तरीही तो रागाला येत नाही. उलट तिला विनम्रतेने समजावतो. तिच्या पायामध्ये पडतो. मालविका जेव्हा वाटते की तो धारिणीला घाबरतो तेव्हा तो तिला दाक्षिण्य असल्याचेच सांगतो.

पराक्रमी—

जरी नाटकात राजा अग्निमित्राला वीरता प्रदर्शित करण्याची कोणतीही संधी मिळत नाही तरीही वसुमित्राव्दारा यवनांना पराजित करण्याची बातमी ऐकुन विदूषक, कंचुकी आणि परिव्राजका यांच्या संवादावरून त्याच्या वीरतेचा संकेत मिळतो.

संयमी—

राजा अग्निमित्राचे चरित्र प्रेम प्रसंगी जेवढे चित्रित करण्यात आले आहे त्यावरून तो संयमी असल्याचे दिसून येते. मालविकाच्या प्रेमात पागल होत असताना सुद्धा तो घाई घाईत



DO NOT COPY

किंवा सुविचार केल्याशिवाय कोणतेही पाऊल उचलत नाही. प्रामुख्याने मालविकाव्दारा नृत्य सादर करताना, उपवनात तिच्यासोबत बोलताना त्याच्या संयमाचा परिचय मिळतो.

कार्यकुशल–

राजा आपल्या राजकार्याचे संचलन खूप कुशलतेने करतो. स्वतः समर्थ असूनही सर्व मंत्र्यांच्या सल्ला मसलीतीनेच करतो. विदर्भ राज्याला दोन भागामध्ये वाटण्याचा प्रस्ताव मंत्रिपरिषदेसमोर ठेवतो. प्रथम अंकात तो राज्याच्या सुरक्षेसाठी चिंतीत दिसतो. तेव्हा ता आपला मेहुणा वीरसेन याला विदर्भावर आक्रमण करायला सांगतो. आपली कार्यकुशलता आणि दूरदृष्टीने तो विदर्भ राज्याला दोन भागामध्ये वाटून एक माध्सवसेन व दुसरा यज्ञसेन याला देतो.

ललित कलाप्रमी–

राजा अग्निमित्र ललित कलेचा प्रेमी आहे. त्याला संगीत, नृत्य, नाट्य इत्यादी कलाविषयी विशेष अनुराग आहे. म्हणूनच त्याच्याजवळ दोन दोन नाट्याचार्य शिक्षण प्रशिक्षणाचे कार्य करतात. एवढेच नाही तर त्याला स्वतःलाही ललित कलेचे ज्ञान आहे.

वरील सर्व विवरणावरून तो केवळ कामी नाही तर वीर, धीर, कुशल राजनीतिज्ञ आणि कलाप्रेमी आहे.

---

## मालविका

मालविका मालविकाग्निमित्रम् नाटकाची नायिका आहे. ती कन्यारूप नायिका आहे. ती मुग्धा, सौंदर्याची खाण, त्याग आणि तपस्येची मूर्ती आहे. शालीन व सहज नारीत्वाची देवी आहे. तिच्या चरित्राचे पैलू खालीलप्रमाणे पाहता येतात.

सौंदर्याची अधिष्ठात्री–

मालविका साधी भोळी कन्या आहे. तिचा छल कपट रहित स्वभाव व पवित्र आचरण आहे. तिच्या चित्राला पाहून राजा मोहित होतो आणि विचार करतो की हे चित्र वास्तविक तर नाही का याच्यामध्ये चित्रकाराची काल्पनिकता आहे. जेव्हा तिला प्रत्यक्ष पाहतो तेव्हा तो



DO NOT COPY

आश्चर्यचकीत होतो. त्याची धारणा बदलते व म्हणतो की चित्रकार तिच्या सौंदर्याला पूर्णपणे आकार देऊ शकला नाही.

संतोषधारिणी–

मालविका एक राजकुमारी असूनही समाधानाची प्रतिमूर्ति दाखवण्यात आली आहे. ज्योतिष्याच्या भविष्यवाणीवर तिला विश्वास होता. म्हणून तिच्यात सहिष्णुतेची भावना विशेष होती. ती आपल्या जीवनाचे रहस्य कोणापुढेही प्रकट करत नाही. राजावर प्रेम करूनही आपल्या मनाची तडप व्यक्त करत नाही.उलट आपल्या हृदयाला समजावते की तू निराश्रयात आश्रय का शोधत आहेस?.

प्रतिभाशालिनी–

ती एक प्रतिभाशाली कन्या आहे. गणदासाच्या शिषत्वामध्ये ती नृत्यकला शिकत होती. गणदासही तिच्या ग्रहणशक्तीवर चकीत झाले होते. ते मुक्त कंठाने तिची प्रशंसा करतात. तिच्या नृत्य कलेची प्रशंसा विदूषकानेही केली. परिव्राजिका तिच्या नृत्याला निर्दोष असल्याचे सांगते.

भारतीय नारी–

मालविका मध्ये भारतीय नारीचे सर्व गुण विद्यमान होते. राजा इत्यादींच्या समोर नृत्य प्रदर्शित करताना ती लाजेन कापू लागते. तसेच राजावर असीम प्रेम करूनही ती आत्मसमर्पण करायला घाबरते. स्त्रीसुलभ सपत्नीव्देश सुद्धा तिच्यामध्ये कमी नव्हता. राजाची व्दितीय पत्नी इरावती सोबत ती खूप ईर्षा करायची. थोडक्यात भारतीय नारीचे सर्व गुण तिच्यात सहज विद्यमान होते.

आदर्श प्रेमिका–

मालविका आकस्मिक दुर्दैवामुळे तेथे येऊन राहत असली तरी तिला राजावर प्रेम होते. भविष्यवाणीनुसार तिला एका वर्षानंतर राणी बनने शक्य होते. दस्युच्या आक्रमणामुळे बिखरलेला परिवार व दासी म्हणून रहावे लागत असल्याने राजासोबत जवळीकता यामुळेच



DO NOT COPY

तिचे राजावर प्रेम झाले असावे अन्यथा राजासारख्या वृद्धावर प्रेम करने योग्य दिसत नाही. ते ही आत्मिक न दिसता वासनात्मकच जास्त वाटते.

---

## धारिणी

राणी धारिणी राजा अग्निमित्राची पट्टराणी आहे. ती जास्त वयाची स्त्री आहे. कारण वसुमित्र तिचा पुत्र आहे. ती एक आदर्श नारी आहे. प्रत्येक कार्य विचार करून करत असते. ती पती परायण व पतिवृता नारी आहे. सर्व प्रकारे पतीची सेवा करणे आपले कार्य समजते. पतीच्या सुखासाठी आपल्या सुखाला त्यागायला ती तयार असते.

## इरावती

राणी इरावती राजा अग्निमित्राची व्दितीय पत्नी आहे. राजा धारिणीपेक्षा इरावतीशी जास्त प्रेम करतो असतो असे दिसते. ती अतिशय मानिनी आहे. प्रणय अपराधी राजा तिच्या पायाशी पडला तरी ती क्रोध त्यागत नाही. ती राजाच्या स्वभावाशी परिचित असल्याने कायम संशयित असते.

●●●

DO NOT COPY

## विक्रमोर्वशीयम् – कालिदास

**नाटकाचा परिचय–**

महाकवि कालिदासाचे हे व्दितीय नाटक आहे. हे त्रोटक कोटीचे उपरूपक आहे. याचे कथानक पुरूरवा व उर्वशी यांच्या कथेवर आधारित आहे. या कथेचे स्त्रोत ऋग्वेद, शतपथब्राह्मण आणि मत्स्यपुराणात पाहायला मिळते. याचे इतिवृत्त पौराणिक असून ते पाच अंकात बद्ध आहे.

**कथावस्तु–**

हिमालय प्रदेशात अप्सरा शिवाची सेवा करून वापस येत असताना केशी नावाचा दानव त्यांच्यातील उर्वशी नावाच्या अप्सरेचे हरण करतो. तिच्या सखी मोठमोठ्याने ओरडू लागतात. तेव्हा जवळून जाणा–या पुरूरवा राजाला त्यांचा आवाज ऐकू येतो. तो केशी इत्यादी दानवांशी लढून उर्वशीला घेऊन येतो. उर्वशी व पुरूरवा परस्पराला पाहून आकर्षित होतात. येथे प्रथम अंक संपतो.

व्दितीय अंकात प्रवेशकाव्दारा सूचना मिळते की राजा उर्वशीच्या प्रेमात पडलेला आहे. राजा बोलताना विदूषकाला आपल्या उर्वशीच्या प्रेमाविषयी सांगतो. याचवेळी उर्वशी व तिची सखी चित्रलेखा तेथे पोहचतात. त्या लपून राजाचे बोलने ऐकतात. उर्वशी एका पानावर प्रेमसंदेश लिहून राजाकडे फेकते. याचवेळी देवी औशनरी तेथे पोहचते. विदूषकाच्या मूर्खतेमूळे ते पान उडून औशनरीच्या पायात पडते. ती पत्र पाहते व राजावर क्रूद्ध होते. राजा तिचा अनुनय करतो. येथे दुसरा अंक समाप्त होतो.

तिस–या अंकात विष्कम्भकाव्दारा सूचना दिली जाते की उर्वशी भरतमुनीव्दारा प्रदर्शित नाटकात लक्ष्मीचा अभिनय करताना पुरूषोत्तमच्या ऐवजी पुरूरवाचे नाव घेते. त्यामूळे कुद्ध झालेले मुनी तिला शाप देतात. पण इंद्राने कृपा करून तिला त्यावेळेपर्यंत पुरूरवाजवळ राहण्याची आज्ञा देतो जोपर्यंत की तिला त्याच्यापासून पुत्र उत्पन्न होत नाही आणि राजा त्या पुत्राचे मुख पाहत नाही. याच अंकात उर्वशी राजाच्या जवळ येते. औशनरीही प्रसन्न होऊन राजाला उर्वशीसोबत प्रेम करू देते.



DO NOT COPY

चौथ्या अंकात पुरूरवा व उर्वशी विहार करण्यासाठी गंधमादन पर्वतावर गेले आहेत. तेथे पुरूरवा एका सुंदर विद्याधर कन्येला निहारत असतो. त्यामुळे रागावलेली उर्वशी त्याला सोडून कुमारवनात जाते. कुमारवन एक शापीत वन आहे जेथे पोहचणारी कोणतीही स्त्री वेल बनून राहते. उर्वशीही वेल बनून जाते. राजा वेडापीसा झाल्याप्रमाने तिला शोधत फिरतो. फिरत असताना त्याला संगमणीय मणी सापडतो. त्याच्या प्रभावामुळे तो त्या उपवनात पोहचतो. त्या वेलीला पाहून पुरूरवा स्पर्श करतो. राजाच्या स्पर्शाने उर्वशी पुन्हा पूर्वीच्या वास्तविक रूपात येते.

पाचव्या अंकात एक गिधाड लाल रंगामुळे संगमणीय मण्याला मांसांचा तुकडा समजून आकाशात घेऊन जातो. राजा मण्याला सोडवण्यासाठी बाण मारतो पण त्यापूर्वीच दुस–याने मारलेल्या बाणाने तो गिधाड खाली पडतो. राजाला मणी मिळतो. ते बाणही राजाजवळ आणले जाते. बाणावर लिहलेल्या अक्षरामूळे कळते की तो बाण पुरूरवा पुत्र आयुष याचा आहे. राजाला आतापर्यंत पुत्राविषयी माहिती नव्हती. उर्वशीने राजा व आपला वियोग होऊ नये म्हणून च्यवन ऋषीच्या आश्रमात लपवून ठेवले होते. ज्यामुळे राजा त्याचे तोंड पाहणार नाही. राजाला ही घटना कळाल्यावर खूप दुःख होते. याचवेळी नारद तेथे येऊन सांगतो की देव व दावनाच्या युद्धात इंद्राला राजा पुरूरवाची सहायता अपेक्षित आहे. याच्या बदल्यात उर्वशी आयुष्यभर राजाजवळ राहू शकते. आणि येथे भरतवाक्याने नाटक समाप्त होते.

---

## पात्र परिचय

### पुरूरवा

पुरूरवा विक्रमोवर्शीयम् नाटकाचा नायक आहे. तो उच्चकुलामध्ये जन्मलेला राजा आहे. शूर, शीलवान, दाक्षिण्ययुक्त व विनम्र आहे. त्याचे आदर्श उच्च आहेत. त्याच्या शौर्यामुळे इंद्रालाही त्याची आवश्यकता पडते. तो वीर आणि लोकप्रिय राजा आहे. उर्वशीला केशी दैत्याव्दारा पकडल्यावर तो आपल्या पराक्रमाने तिला वाचवतो व सोबत आणतो. सर्व अप्सरांना त्याच्या पराक्रमावर विश्वास आहे. मेनका तर म्हणते की, ते निसंदेह कष्ट दूर



DO NOT COPY

करतील कारण ते इतके पराक्रमी आहेत की, युद्धकाळात इंद्रही मृत्युलोकातून त्याला बोलावून सेनापती बनवतो.

आपल्या पराक्रमाने उर्वशीला केशी दैत्यापासून मुक्त करूनही त्याचे श्रेय तो इंद्राला देतो. यातून त्याची अहंकारहीनता व विनम्रता दिसून येते. कालिदासाच्या अन्य नायकांप्रमाणे हाही बहुपत्निक आहे. उपकार करण्याने तो आदरणीय आहे. चित्ररथ त्याच्या उपकाराचे वर्णन करतो पण तो त्याला इंद्राचा पराक्रम मानतो. चित्ररथ त्याच्या पराक्रमाला अनहंकाराने सुशोभित मानतो. इंद्रालाही भावी देवासूर संग्रामात त्याची आवश्यकता भासेल असे वाटते म्हणून तो संदेश पाठवतो की त्याने शस्त्राचा त्याग करू नये. उर्वशी जीवनपर्यंत त्याची सहधर्मचारिणी राहील. वैतालिकही त्याच्या पराक्रमाचे वर्णन करतो.

राजा पुरूरवा गुरूजनांप्रति विनम्र आहे. नारदमुनी आल्यावर स्वतः अर्घ्यजल घेऊन विनम्रता पूर्वक प्रणाम करतो. तो सौंदर्यपूर्ण व विशालकाय आहे. त्याची सौंदर्यदृष्टी ऐंन्द्रियमूलक दिसते. उर्वशीला वाचवल्यावर ती होशमध्ये येताच तिच्या सौंदर्याची स्तुती करतो.

तो दाक्षिण्ययुक्त स्वभावाचा आहे. प्रमदवनात विदूषकाच्या चुकीमूळे उर्वशीचे भोजपत्र राणी औशनरीला मिळते व ती क्रोधीत होते तेव्हा आपला अपराध स्विकार करतो व तिच्या पायामध्ये पडतो. तो विदूषकाला म्हणतो उर्वशीमध्ये मन अडकले असले तरी राणी औशनरीबद्दल आदरभाव आहे. पुरूरवाचे चित्रण प्रणयी राजाच्या रूपात करण्यात आले आहे. त्याची प्रकृती धीरोदात्त आहे. पण अन्यत्र धीर व स्त्री समोर मात्र दुर्बल प्रतीत होतो. उर्वशीसाठी त्याचा विलाप पौरूषाला अनुकूल नाही. तो वात्सल्य भावनेने पूर्ण आहे. आपल्या पुत्राच्या प्रथम दर्शनाने त्याची वात्सल्य भावना उसळून येते. तो कुशल राजा आहे. राज्यव्यवस्था व आपल्या दैनिक कार्याला शास्त्रानूकूल विधिनुसार पार पाडतो. तो धार्मिक आहे. संकटात सापडलेल्यांची मदत करतो. नाट्यशास्त्रीयदृष्ट्या धीरोदात्त, दाक्षिण्ययुक्त आहे.



DO NOT COPY

# उर्वशी

उर्वशी विक्रमोर्वशीयम् नाटकाची नायिका आहे. अप्सरा असल्याने तिचे सौंदर्य अप्रतिम आहे. ती प्रसन्नवदना अलौकिक रूपवती आहे. तिच्या दैवी व मानवीय गुणांचे मिश्रण पाहायला मिळते. ती नारायण मुनीच्या जांघेतून उत्पन्न झाली आहे. तिच्या जीवनाचा प्रमुख पक्ष प्रेम आहे. कैशी राक्षसापासून मुक्त केल्यावर जेव्हा ती पुरूरवाला प्रथमवेळी पाहते तेव्हा त्याच्यावर आसक्त होते. ती स्वतः चित्रलेखा सोबत त्याला भेटायला जाते. ती त्याच्याजवळ शिखाबन्धनी विद्येच्या प्रभावाने अदृश्य होऊन जाते व त्याच्या मनोव्यथा जानते. त्याच्या मनोव्यथा जाणून सखीच्या सांगण्यानुसार प्रेमपत्र लिहते.

देवदूताकडून इंद्राचा आदेश वापस येण्याचा आदेश मिळाल्यावर ती वियोगाचे दुःख व्यतीत करत वापस जाते. पुरूरवाच्या प्रेमामध्ये एवढी आसक्त असते की भरतमुनीच्या नाटकात अभिनय करताना पुरूषोत्तम म्हणण्याऐवजी पुरूरवा म्हणते व भरतमुनीच्या शापाने पून्हा स्वर्गातून खाली येते. तिला पुरूरवा पासून पुत्र प्राप्ती व त्याचे राजाने मुख पाहण्यापर्यंत राहण्याचा शाप मिळतो.

उर्वशीचे पुरूरवावर इतके जास्त प्रेम आहे की ती आपल्या पुत्रालाही वियोग भयामूळे दूर ठेवते.  त्याला पालनार्थ सत्यवतीकडे देते. पतीप्रेमासाठी पुत्रत्याग खूप कठीण कार्य आहे. तिच्यामध्ये स्त्री सुलभ इर्षाही कमी नाही. गन्धमादन पर्वतावर विहार करताना राजा पुरूरवा विद्याधर कुमारी उदवतीच्या सौंदर्याकडे आकर्षित होऊन खूप वेळ पाहू लागतो तेव्हा ती क्रुद्ध होऊन निघून कुमारवनात जाते आणि तेथे लतारूपात परिणत होते.

उर्वशीने आपल्या पुत्राला पतीमुळे त्यागले असले तरी तिच्यात मातृसुलभ वात्सल्य कमी नव्हते. राजाच्या मांडीवर पुत्राला पाहिल्यावर तिला दुधाचा पाझर फुटतो. नाट्यशास्त्रीय दृष्ट्या ती साधारण स्त्री किंवा गणिका नायिका आहे.

---

●●●



DO NOT COPY

## अभिज्ञानशाकुन्तलम् – कालिदास

**नाटकाचा परिचय–**

महाकवि कालिदासाचे हे तृतीय नाटक आहे. कालिदासाच्या नाट्यकलेची चरमसीमा या नाटकात पाहायला मिळते. याचे कथानक दुष्यन्त व शकुन्तला यांच्या प्रेमकथेवर आधारित आहे. या कथेचे स्त्रोत महाभारतात व पद्मपुराणात सापडते. मूळ कथानकात आपल्या कल्पनाशक्तीने बदल करून उत्कृष्ट नाटक बनविले आहे. हे सात अंकात बद्ध आहे. नाटकाचा मुख्य रस श्रृंगार आहे.

**कथावस्तु–**

राजा दुष्यन्त शिकार खेळत खेळत कण्वाच्या आश्रमात पोहचतो. तेथे वृक्षांना पाणी देणा–या तीन मुनीकन्यांना पाहतो. शकुन्तलेला पाहून दुष्यन्त तिच्याकडे आकर्षित होतो. याचवेळी एक भुंगा उडत उडत शकुन्तेलेच्या जवळ फिरू लागतो. शकुन्तला घाबरून मदतीसाठी ओरडू लागते. योग्य संधी पाहून वृक्षांच्या आडवे लपलेला राजा पूढे येऊन भुंग्याला पळवून लावतो. येथे शकुन्तलेच्या मनातही राजाच्या प्रती आकर्षण निर्माण होते. राजा आपला खरा परिचय न देता स्वतःला राजाचा सामन्त असल्याचे सांगतो. याच अंकात राजाला शकुन्तला विश्वामित्र व मेनका अप्सरेची मुलगी असून ती क्षत्रियाव्दारा विवाह करण्यायोग्य असल्याचे समजते.

व्दितीय अंकात राजा विदूषक माधव्याला आपल्या प्रेमाविषयी सांगतो. राजा तपोवनात थांबण्याचा काही बहाणा शोधत होता त्याचवेळी तपोवनातील काही तपस्वी राजाला काही दिवस थांबून राक्षसांपासून संरक्षण कराण्याची विनंती करतात. इकडे राजधानी इंद्रप्रस्थावरून राजाला देवी वसुमतीचा संदेश येतो की तिच्या उपवासाच्या पारण्यादिवशी राजाने उपस्थित रहावे. एका बाजुला प्रेम व दुस–या बाजुला कर्तव्य यात राजाची अवस्था त्रिशंकुप्रमाणे होते. शेवटी राजा विदूषकाला स्वतःऐवजी राजधानी पाठवतो पण पाठवताना शकुन्तलेची गोष्ट तो सर्वांना सांगेल म्हणून ते सर्व खोटे व मजाक असल्याचे सांगतो.

तृतीय अंकात राजा स्वतः विरहाने व्याकूळ होतो व लपून छपून शकुन्तलेच्या विरहाचाही पता लावतो. लतागृहात पडलेली विरहाने व्याकूळ शकुन्तला त्याला



DO NOT COPY

पाठवण्यासाठी पत्र लिहते त्यावेळी लपलेला राजा समोर प्रकट होतो. त्या दोघांचाही गांधर्व विवाह होतो. राजा दुष्यन्त आपली अधर पिपासा शांत करणार तेवढ्यात सख्या रात्र झाल्याने विदा होण्याचा संकेत देतात. राजालाही राक्षस आल्यामुळे रक्षणासाठी जावे लागते.

चतुर्थ अंकात विष्कंभकाव्दारे कळते की राजा राजधानी इंद्रप्रस्थाला वापस गेला आहे आणि शकुन्तला त्याच्या विरहात दुःखी आहे. त्याचवेळी दुर्वासा नावाचे ऋषी तिच्याकडे येतात. ती राजाच्या चिंतेमध्ये मग्न असल्याने तिच्याकडून दुर्वासाचा आतिथ्य सत्कार होत नाही. आपली उपेक्षा झाल्याचे समजून ते तिला शाप देतात की ज्याची ती आठवण करत आहे तो तिला स्मरण करणार नाही. तिची सखी प्रियंवदा दुर्वासा ऋषीच्या मागे मागे पळत जाते व त्यांना  प्रसन्न करते. ते प्रसन्न होऊन तो राजा एखाद्या वस्तुला अभिज्ञान पाहून शकुन्तलेला ओळखेल असा उशाप देतात. कण्व तीर्थयात्रेवरून वापस येतात व शकुन्तलेच्या गान्धर्व विविहाची गोष्ट जाणून तिला पतीकडे पाठवण्याची तयारी करतात. या अंकाचा उतरार्ध तपोवनातून विदा होणा—या शकुन्तलेच्या करूण वर्णनाने कण्वासारख्या वनवासी तपस्वालाही व्याकूळ बनविणारा असल्याने सर्वोत्तम बनला आहे.

पाचव्या अंकात शकुन्तलेला घेऊन गौतमी, शारगंरव आणि शारव्दत राजा दुष्यन्ताच्या दरबारात पोहचतात. राजा दुष्यन्त दुर्वासाच्या शापानुसार शकुन्तलेला ओळखत नाही. शकुन्तला प्रमाण दाखवण्यासाठी म्हणून अंगुठी शोधते पण ती मिळत नाही. वाटेत येताना एका नदीमध्ये स्नानासाठी गेल्यावर ती पाण्यामध्ये पडली होती. दुष्यन्ताव्दारा परित्यक्त शकुन्तलेला वापस आश्रमात घेऊन जाणे शारव्दत अनुचित समजतो. गौतमी, शारंगरव व शारव्दत वापस जातात. शकुन्तलेला कोणीतरी देवी घेऊन गेल्याचे समजते.

सहाव्या अंकात प्रवेशक हरवलेल्या अंगुठीचा शोध घेतो. एक कोळी राजनामांकीत अंगुठी विकताना सापडतो. अंगुठी सोबत त्या कोळ्याला राजासमोर प्रस्तुत केले जाते. अंगुठी पाहताच शाप दूर होऊन राजाच्या जुन्या आठवणी ताज्या होऊ लागतात. त्याला शकुन्तलेविषयी सर्व आठवण येते. तो पश्चातापदग्ध व विरहाने तडफडू लागतो. तो माधव्यासोबत गप्पा मारत मनोविनोदासाठी चित्र काढत असतो. तेव्हा त्याला इंद्रावर आक्रमण करणा—या कालनेमी इ. दानवासोबत युद्ध करण्यासाठी बोलाविले जाते.

DO NOT COPY

सातव्या अंक कालनेमी दानवाला जिंकून आकाशमार्गाने इंद्ररथाव्दारा वापस येणा–या दुष्यन्ताच्या वर्णनाने आरंभ होतो. वाटेत गंधमाधन पर्वतावर स्थित मारीच ऋषीचे आश्रम दिसते. मारीच ऋषीचे दर्शन घेऊन पूढे जावे अशा विचाराने सारथी मातलीला आश्रमात रथ थांबायला सांगतो. तो जेव्हा आश्रमात प्रवेश करतो तेव्हा वाघाच्या पिल्यासोबत खेळणा–या एका बालकाला पाहतात. खेळताना त्या बाळाच्या हातातील अपराजिता औषधी दोरी खाली पडते. राजा त्या दोरीला उचलतो. दोन तापसकन्या याला पाहून आश्चर्यचकीत होतात कारण बाळाच्या आई वडिलाशिवाय त्या दोरीला कोणीही स्पर्श करू शकत नाही जर कोणी स्पर्श करण्याचा प्रयत्न केला तर ती साप होऊन त्याला डसते. राजा भरत नामक त्या बाळाला आपल्या मांडीवर उचलून घेतो. याचवेळी मळालेले वस्त्र घातलेली शकुन्तला तेथे येते. या दोघांचेही करूण मिलन होते. सर्वजण मिळून मारीच ऋषीच्या दर्शनाला जातात. मारीच दोघांनाही आशीर्वाद देतात व भरतवाक्याने नाटक संपते.

---

**पात्रपरिचय–**

**राजा दुष्यन्त**



**धीरोदात्त नायक–**

राजा दुष्यन्त शाकुन्तलम् नाटकाचा नायक आहे. शास्त्रीय दृष्टीने तो धीरोदात्त नायक आहे. दशरूपकानुसार धीरोदात्त नायकात हे गुण असले पाहिजेत –तो महाबली,

अतिगंभीर, क्षमाशील, स्थिर प्रकृती, अनहंकारी आणि दृढनिश्चयी असावा. हे सर्व गुण त्याच्यामध्ये आहेत. तो पुरूवंशी क्षत्रिय राजा आहे.

### सुंदर व धष्टपुष्ट –

तो सुंदर व धष्टपुष्ट तरूण आहे. त्याचे वय जवळपास 30 ते 35 वर्ष असावे. त्याच्या शारिरीक मजबुती आणि सौंदर्याने सर्वजण प्रभावित होतात. त्याला पाहताच शकुन्तला इत्यादी प्रभावित होतात. चतुरगम्भीराकृतिर्मधुरं प्रियमालपन् प्रभाववान इव लक्ष्यते।

तो कठीणात कठीण काम करू शकतो. म्हणूनच त्याला नगरपरिघप्रांशुबाहुः। असे म्हटले आहे.

### मृगयाप्रेमी –

तो मृगयेचा म्हणजेच शिकारीचा प्रेमी आहे. तो धनुष्याच्या टंकारानेच यज्ञामध्ये विघ्न आणणा–या राक्षसांना पळवून लावतो. तो एवढा पराक्रमी आणि शुरवीर आहे की इंद्रही त्याची मदत मागतो. दानवाच्या वधासाठी त्याला स्वर्गात बोलावतो.

### मधुरभाषी –

तो मधुरभाषी आहे. प्रियंवदा त्याच्या मधुरभाषणाची प्रशंसा करते. त्याचे विचार उत्तम आणि संतुलित आहेत.त्याला जोपर्यत हा निश्चय होत नाही की शकुन्तला क्षत्रिय कन्या आहे तोपर्यंत तो विवाहाचा विचार प्रकट करीत नाही.

तो उत्तम पती आणि उत्कट प्रेमी आहे. तिस–या अंकात शकुन्तला अस्वस्थ असल्याचे पाहून तो तिचे पाणिग्रहण आणि रक्षण करण्याचे स्वीकार करतो. तो रूग्ण शकुन्तलेला उन्हात जाउ देत नाही आणि तिची सेवा करू–शुश्रुषा करतो.

### मातृभक्त आणि आज्ञाकारी –

तो मातृभक्त आणि आज्ञाकारी पुत्र आहे. व्दितीय अंकात मातेची आज्ञा मिळताच ऋषि कार्याची विवशतेमुळे विदूषकाला मातेकडे पाठवतो. तसेच तो कलाप्रेमी आणि गुणग्राही आहे.



DO NOT COPY

पाचव्या अंकात सानुमतीचे संगीत ऐकून मंत्रमुग्ध होतो. तो कुशल चित्रकार आहे.शकुन्तलेच्या अपूर्ण चित्राला पूर्ण करतो.

**ऋषिविषयी आदरभाव –**

त्याच्या हृदयात ऋषिविषयी खूप आदरभाव आहे. तो तपस्व्याच्या सांगण्यावरूनच मृगावर बाण चालवत नाही. विनीतवेषाने आश्रमामध्ये प्रवेश करतो. हाथी आश्रमामध्ये विघ्न उपस्थित करताच सैनिकांना थांबवण्यासाठी जातो. यज्ञाचे रक्षण करण्याचे लगेच मान्य करतो. शारंगरव इ.च्या आक्षेपांना शांतीने उत्तर देतो.

**सह्रय आणि संयमी –**

तो सह्रय आणि संयमी आहे. तो धनमित्र नावाच्या व्यापा–याची मृत्यु झाल्यावर शोक प्रकट करतो. संतानहीनता त्याला खूप दु:खी करते. तो धनमित्राच्या गर्भस्थ बालकाला त्याचे धन देतो. प्रजेचे रक्षण करणे परम धर्म समजतो. दु:खीचे दु:ख दूर करायला सदा उद्युक्त असतो. परस्त्रीला पाहणे पाप समजतो.

**उच्च कोटीचा शासक –**

तो उच्च कोटीचा शासक असून एका सफल शासकाचे सर्व गुण त्याच्यात आहेत. कर्तव्यपारायण, प्रजाप्रेमी, निर्लोभी, सह्रय, संयमी, निर्भीक, पराक्रमी,आणि विनीत आहे.

यज्ञाचे रक्षण आणि दानवाच्या वधात आपली कर्तव्यपारायणता दाखवून देतो. प्रजेमध्ये घोषणा करतो की तो बन्धुहिनाचा बन्धु आहे. धनमित्राच्या धनाला राजकीय धन बनवत नाही. शापाचा प्रभाव संपताच तो शकुन्तलेविषयी अत्यंत व्याकुळ होतो.

कालिदासाने दुष्यंताच्या चरित्राला अतिशय उन्नत चित्रित केले आहे. त्याला आदर्श राजाच्या रूपात प्रस्तुत केले आहे.

---

## शकुन्तला

**आदर्श नायिका –** शकुन्तला अभिज्ञानशाकुन्तलम् नाटकाची नायिका आहे. तिचे पिता विश्वामित्र आणि माता मेनका आहे. विश्वामित्राची तपस्या भंग करण्यासाठी इंद्राने मेनका



DO NOT COPY

नावाच्या अप्सरेला त्यांच्याजवळ पाठवले होते. मेनकाकडून त्यांची तपस्या भंग झाली आणि दोघांच्या संपर्कातून शकुन्तला जन्माला आली. दोघांनीही तिला त्यागले. काही काळ शकुन्तानी (पक्षांनी) तिचे पालन केले म्हणन तिचे शकुन्तला असे नाव पडले. ऋषि कण्वांनी त्या परित्यक्तेचे पालन केले म्हणून ते तिचे धर्मपिता झाले.

### अनुपम सुंदरी –

शकुन्तला जवळपास 18 वर्षाची कन्या आहे. ती अनुपम संदरी आहे. राजा दुष्यन्त तिचे सौंदर्य पाहून मंत्रमुग्ध होतो. 'मानषीषु कथं वा स्यात् अस्य रूपस्य संभव। तिचे सौंदर्य नैसर्गिक आहे.–इदं किलाव्याजमनोहरं वपुः। तिच्या अंगामध्ये असाधारण लावण्य आहे.–**अधर** किसलयरागः ...। ती गौरवर्णाची आहे. आश्रमात तिचे पालन पोषण झाले म्हणून तिच्यात स्वाभाविक सरलता, सुशीलता आणि मुग्धता आहे.

### सुशील आणि लाजाळु –

ती अत्यंत सुशील आणि लाजाळु आहे. राजाला पाहताच तिच्या मनामध्ये कामभावना जाग्रत होते पण ती व्यक्त करीत नाही.– 'किं नु खलु इमं जनं प्रेक्ष्य..।' तृतीय अंकात तिची अवस्था बिगडते परन्तु ती आपल्या मैत्रिणींनाही सांगायला संकोच करते.–'यतः प्रभति मम दर्शनपथमागतः..।'

प्रथम अंकात जेव्हा राजा तिची प्रशंसा करतो तेव्हा ती लाजेने आपली मान खाली घालते. ती मधुरभाषिणी आहे. अनसूया व प्रियंवदा तिच्याशी विवाहाची गोष्ट करतात तेव्हा ती कटु उत्तर देत नाही –'युवामपेताम्। किमपि हृदये कृत्वा मन्त्रयथे।'

### निसर्गकन्या –

आश्रमात तिचे पालन पोषण झाल्यामुळे तिचे निसर्गाशी घनीष्ठ प्रेम आहे. ती वृक्ष, वनस्पती आणि मृग इत्यादींशी आपुलकी अनुभव करते.– 'अस्ति मे सोदरस्नेहोऽप्येतेषु।'

आश्रमातील वृक्षांना पाणी पाजल्याशिवाय स्वतः पाणी पित नाही. मण्डन अलंकार प्रिय असतानाही वृक्षांची पाने इत्यादी तोडत नाही. – 'पातुं न प्रथमं व्यवस्यति **...।'** आश्रमातून विदाई / निरोप घेतानाही ती वृक्ष आणि मृग इत्यादीपासून निरोप घेते.



DO NOT COPY

## पतिव्रता –


ती पतिव्रता आहे. ती विवाहानंतर पतीच्या चिन्तनातच मग्न असते. ती राजाच्या विरहामध्ये व्याकूळ आणि अन्यमनस्क आहे. त्याचवेळी दुर्वासा ऋषी येतात. तिला त्यांचे काहीही भान नाही त्यांनी तिला शाप दिल्याचेही भान नाही.

पाचव्या अंकात राजाने जेव्हा तिचा त्याग केला तेव्हाही ती पतिव्रताच राहिली. ती मारीचीच्या आश्रमात तपस्वीनी सारखी राहिली. ती स्वतःलाच दोष देते राजाला नाही. विरहिणी सारखे तिचे वस्त्र होते. राजाला भेटताच ती स्वतः भाग्यशाली समजते.

## वरिष्ठाविषयी आदर –

ती आपल्या पूज्यजनांचा विशेष आदर करते. राजाकडून आपले पाय दाबून घेत नाही. शारंगरवाने तिला रागावल्यावरही त्याला प्रत्युत्तर देत नाही. ऋषि कण्वाविषयी तिची श्रद्धा अगाध आहे. तिला भिती आहे की त्यांचा वियोग ती सहन करेल की नाही. राजासोबत मारीच ऋषीकडे जायलाही ती लाजते.


अशाप्रकारे शकुन्तला एक आदर्श नायिका आहे. तिच्या स्त्रियोचित गुणांमुळे आणि अलौकिक सौंदर्यामुळे ती नाटकातील सर्वात महत्वाचे पात्र ठरली आहे म्हणूनच नाटकाच्या नावातही तिचाच समावेश असल्याचे पाहायला मिळते.





DO NOT COPY

## महर्षि कण्व/ काश्यप



DO NOT COPY

### आश्रमाचे कुलपती –

महर्षि कण्व आश्रमाचे कुलपती आहेत. त्याचेच दुसरे नाव काश्यप आहे. ते नैष्ठिक ब्रम्हचारी आहेत. त्यांच्या आश्रमात यज्ञशाला आहे. ते श्रौतविधिने अग्निहोत्र करणारे ब्राह्मण आहेत. त्यांचे तपोबल असाधारण आहे. ते वर्तमान, भूत आणि भविष्याला जाणणारे आहेत. 'तपःप्रभावात् प्रत्यक्षं सर्वमेव तत्रभवतः।' त्यांच्या तपाच्या प्रभावामुळे राक्षस यज्ञात विघ्न उपस्थित करीत नसत.

### शकुन्तलेची काळजी –

महर्षि कण्व तिन्ही काळाचे ज्ञाते असल्याने त्यांना कदाचित शकुन्तलेच्या संकटाची जाणीव असावी. म्हणूनच ते त्याच्या निवारणार्थ सोमतीर्थाला गेले होते. आकाशवाणी त्यांना सांगते की शकुन्तलेच्या पोटात दुष्यंताचा गर्भ आहे. त्यांच्या तपस्येच्या प्रभावामुळेच शकुन्तलेला निरोप देताना वृक्ष आभूषणे रेशमी वस्त्र इत्यादी देतात.

### धर्मपुत्री शकुन्तला –

शकुन्तला त्यांची धर्मपुत्री आहे. परित्यक्त शकुन्तलेचे ते स्वतःच्या मुलीप्रमाणे पालन करतात. त्यांचे प्रेम निःस्वार्थ आहे. ते शकुन्तलेला आपल्या जीवनाचे सर्वस्व समजतात. तिच्या निरोपाच्या वेळी ते सख्या आई–वडिलाप्रमाणे व्याकुळ होतात. त्यांचा गळा भरून

येतो.(रूंधतो) – यास्यतद्य शकुन्तलेति। ते आपला शोक कमी होईल कमी होईल –शममेष्यति मम शोकः। म्हणून आपले हार्दीक प्रेम प्रकट करतात. शकुन्तलेच्या जाण्याने ते खिन्न होतात.– गतवती वां सहचारिणी। शकुन्तलेवरचे त्यांचे निस्वार्थ प्रेम आदर्श प्रेमाचे मूर्तिमंत रूप आहे.

**लौकिक व्यवहारज्ञ –**

ते ऋषी असनही लौकिक व्यवहाराला चांगले जाणतात. 'वनीकसोऽपि सन्तो वयम्।' त्यांनी शकुन्तलेला जो उपदेश दिला आहे तो स्वर्णाक्षरामध्ये लिहून ठेवण्यासारखा आहे. 'शुश्रूषस्व गुरून्...।' त्यांनी राजाला दिलेला संदेशही लोकव्यवहारज्ञतेचा परिचायक आहे. अस्मान साधू..।

ते शकुन्तलेच्या सोबत अनसूया व प्रियंवदेलाही पाठवत नाहीत कारण अविवाहित मुलींना विवाहित मुलीसोबत सासरला पाठवणे उचित नाही हे ते जाणतात.

**मनोज्ञ –**

ते मानवाच्या मनाला किंवा स्वभावाला चांगल्या प्रकारे जाणतात. ते जाणतात की अन्य कार्यामध्ये व्यस्त झाल्यावर व्यक्ती दुःख विसरतो. म्हणून ते शकुन्तलेला म्हणतात की राजाच्या घरी गेल्यावर कार्यामध्ये व्यस्त होऊन तू माझे दुःख विसरशील. 'अभिजनवतो भर्तुः।' ते कन्येला धरोहर समजतात. कन्येचे पालन पोषण खूप सावधानीने व्हायला पाहीजे. तिला पतीच्या घर पाठवून सुखाचा अनुभव करतात. 'अर्थो ही कन्या परकीय एव।'

अशाप्रकारे महर्षि कण्व आश्रमाचे कुलपती, नैष्ठिक ब्रम्हचारी, तपस्वी, धर्मपिता, लोकव्यवहारज्ञ इत्यादी गुणांनी एक आदर्श पिता व ऋषी आहेत.

---

DO NOT COPY

# मृच्छकटिकम्–शूद्रक

## शूद्रकाचा परिचय–

संस्कृत साहित्यात राजा शूद्रक यांच्याविषयी अनेक दन्तकथा व मतमतांतरे प्रचलित आहेत. मृच्छकटिकम् नाटकाच्या प्रस्तावनेनुसार याचा रचयिता शूद्रक आहे. कादम्बरी, कथासरित्सागर व वेतालपंचविंशति यात शूद्रक राजा असल्याचे उल्लेख आहे. स्कंद पुराणात राजा शूद्राकाला आंध्रभ्रत्य म्हटले आहे. पिशल नावाच्या विद्वानाने दण्डीलाच मृच्छकटिकम्चा रचयिता मानले. याचप्रमाणे शूद्रकाविषयी अनेक वेगवेगळी मते प्रचलित आहेत.

स्कंद पुराणातील आंध्रभृत्य राजा शिवदत्तला शूद्रक मानले तर याचा काळ विक्रमादित्याच्या 27 वर्ष पूर्वी होता. मृच्छकटिकम्ची रचना विविध उपलब्ध प्रमाणानुसार इ. सनाच्या प्रथम शताब्दी जवळची मानली जाऊ शकते.

## नाटकाचा परिचय–

मृच्छकटिकम् संस्कृतमधील प्रसिद्ध नाटक असून याचा अनुवाद विविध भाषेत झाला आहे. भारत व भारताबाहेरील अमेरिका, रूस, फ्रांस, जर्मनी, इटली, इंग्लड येथील अनेक रंगमंचावर याचे सफल प्रयोग झाले आहेत.

मृच्छकटिकम् म्हणजे मातीची गाडी होय. यात दहा अंक असून हा संकीर्ण कोटीचा नाटक आहे. दशरूपकानुसार मिश्र प्रकारच्या प्रकरणाचे हे सर्वोत्तम उदाहरण आहे. या नाटकाची पाश्वभूमी पाटलीपुत्र म्हणजे आधुनिक पटना आहे. उज्जयिनीचा निवासी सार्थवाह नावाचा व्यापारी ब्राह्मण चारूदत्त याचा नायक आहे. गणिका वसंतसेना नायिका आहे. या दोघांची प्रेमकथा हा मुख्य वृत्त आहे. उज्जयिनीचा राजा पालक याला काढून आर्यक राजा होण्याची घटना पताका म्हणजे उपकथा आहे. मध्यमवर्गीयाचा व समाजातील यथार्थ जीवनाचे प्रतिनिधित्व हे नाटक आहे.

## कथावस्तू–

पहिल्या अंकात शकार नावाचा खलनायक नायिका वसंतसेना हिला प्राप्त करू इच्छितो. एका रात्री तो वसंतसेनेचा पाठलाग करतो. भयभित झालेली वसंतसेना चारूदत्ताच्या घरी शरण घेते. चोरापासून वाचवण्यासाठी सर्व दागिने चारूदत्ताला ठेवण्यास देते. दुस–या अंकात संवाहक जो चारूदत्ताचा सेवक होता. तो जुवा खेळताना सर्व धन



DO NOT COPY

हारतो व सावकारापासून वाचण्यासाठी वसंतसेनेच्या घरी शरण घेतो. ती आपल्या बांगड्या देऊन त्याला सावकारापासून ऋणमुक्त करते. त्यानंतर तो बौद्ध भिक्षु बनतो.

तिस–या अंकात वसंतसेनेची दासी मदनिका हिला दासत्वातून मुक्त करण्यासाठी तिचा प्रेमी शार्विलक चोरी करण्यासाठी चारूदत्ताच्या घरामध्ये घुसतो. चारूदत्त आणि मैत्रेय गाढ झोपी गेलेले असतात. चारूदत्ताने सोपवलेली दागिन्याची पेटी मैत्रेय झोपेमध्ये बडबडत चारूदत्त समजून चोरी करण्यासाठी आलेल्या शार्विलकाला देतो. शार्विलक दागिने घेऊन आपली प्रेमिका मदनिकाकडे जातो. मदनिका आपल्या मालकिनीचे (वसंतसेनेचे) दागिने ओळखून शार्विलकाला भांडते. मग तिच्या सांगण्यावरून स्वतःला चारूदत्ताचा दूत सांगून त्याच्या तर्फे सर्व दागिने वसंतसेनेला वापस देऊ लागतो. वसंतसेना वास्तविक गोष्ट जाणून हसत हसत मदनिकेला विनाशुल्क मुक्त करून शार्विलकाकडे सोपवते. इकडे चारूदत्त घरात चोरी झाल्याचे पाहून खूप दुःखी होतो. तो दान करून करून निर्धन झाला होता. यावेळी त्याची साध्वी पत्नी त्याला मदत करण्यासाठी वसंतसेनेला दागिन्याच्या बदल्यात देण्यासाठी स्वतःची रत्नावली काढून मैत्रेयला देते.

वसंतसेना आपल्या प्रियकराला भेटण्यासाठी निघते. मैत्रेयपासून रत्नावली घेऊन चारूदत्ताच्या घरी जाते. जेथे सोन्याच्या गाडीसाठी रडत असलेल्या चारूदत्ताचा मुलगा रोहसेन याच्या मातीच्या गाडीत सर्व दागिने भरते. नंतरच्या दृश्यात रस्त्यावर थांबलेल्या शकाराच्या गाडीत आपल्यासाठी चारूदत्ताने पाठवलेली गाडी समजून बसते. चारूदत्ताने वसंतसेनेसाठी पाठवलेल्या गाडीत राजाच्या कारागृहातून पळालेला गोपालदारक आर्यक बसतो. पळालेल्या बंदीच्या शोधार्थ सर्व गाड्या राजसेवकाव्दारा तपासल्या जातात. चंदन नावाचा सेवक आर्यकाला ओळखतो पण राजभक्तीचा विचार सोडून विद्राही आर्यकाला सोडून देतो. आर्यक चारूदत्त वसंतसेनेची वाट पाहत बसलेल्या उद्यानात पोहचतो.

इकडे वसंतसेना शकाराच्या जाळ्यात सापडून त्याच उद्यानात पोहचते. जेथे शकार तिचा गळा दाबून ती मेली असे समजून तिला झाडांच्या वाळलेल्या पानांमध्ये लपवून निघून जातो. त्याचवेळी बौद्ध भिक्षू संवाहक तेथे येऊन वसंतसेनेला बौद्ध विहारात घेऊन जातो.

शकार न्यायाधिशाच्या पूढे चारूदत्तावर वसंतसेनेच्या खूनाचा आरोप लावतो. संयोगाने याच वेळी विदूषक वसंतसेनेच्या दागिन्याची पेटी घेऊन तेथे येतो. यावरून असे मानले जाते की दागिन्यासाठी चारूदत्ताने वसंतसेनेचा खून केला. चारूदत्ताला फासीची सजा होते. त्याला



DO NOT COPY

जल्लाद फासावर चढवण्यासाठी घेऊन जातो, त्याचवेळी संवाहक वसंतसेनेला घेऊन तेथे पोहचतो. या दरम्यान राज्यामध्ये क्रांती होते आणि दुराचारी राजा पालक याला काढून आर्यक सिंहासनावर बसतो. वसंतसेना आणि चारूदत्ताच्या मिलनाने नाटक समाप्त होते.

**पात्रपरिचय–**

**चारूदत्त**

मृच्छकटिकम् मध्ये चारूदत्ताला सुंदर, युवक, परोपकारी, गुणग्राही, उदार, भावूक, उत्कट प्रेमी, सत्यवक्ता, शरणांगत वत्सल, परत क्षमाशील इत्यादी रूपात चित्रित करण्यात आले आहे. त्याने उज्जयिनीच्या संपन्न वंशामध्ये जन्म घेतला. त्याचे वंशज ब्राह्मण होते परन्तु व्यापाराच्या माध्यमाने खूप संपत्ती जमा केली होती. तो निर्लोभी व उदारवृत्तीचा होता. तो कोणालाही निराश करत नव्हता. त्याचं व्यक्तीत्व आकर्षक व गुणी होते. संवाहक वसंतसेनाला त्याचा परिचय देताना त्याला प्रियदर्शन म्हणतो. जेलमधून पळालेला संवाहक त्याला पाहून म्हणतो की 'न केवलं श्रुतरमणीयो दृष्टिरमणीयोऽपि।' न्यायधिशही त्याला खून न करण्यासारखी आकृती म्हणतो.

तो खूप उदार आहे. चोर त्याच्या घरात चोरी करायला येतात तेव्हा तो या गोष्टीमुळे दुःखी होतो की त्याच्या घरात चोरायला काहीही नाही. कर्णपुरक जेव्हा मत्त हाथीला मारतो तेव्हा तो त्याला अंगुठी देण्याचा प्रयत्न करतो पण ती नसल्याने दुपट्टा देतो. तसेच पाचव्या अंकातही चेट वसंतसेनेच्या आगमनाची खबर देतो तेव्हा त्यालाही दुपट्टा देतो.

त्याच्या मनात प्राणिमात्राविषयी दया आहे. तो कोणालाही दुःख आणि कष्ट देऊ इच्छित नाही. तो आपल्या आरामासाठी दुस–याला दुःख देत नाही म्हणून रात्री झोपलेल्या रदनिकेला जागवू देत नाही. दयाळूपणाची चरतसीमा म्हणजे त्याला स्वतःला मारण्याचा कट रचणा–या शकारालाही शेवटी मुक्त करतो.

चारूदत्त आपल्याजवळ आलेल्या शरणांगताची प्राण देवूनही रक्षण करण्याचा प्रयत्न करतो. कारागृहातून पळून आलेल्या आर्यकाला तो शरणांगती देतो. शरणांगती आलेल्या शकारालाही शरण देतो. तसेच तो सत्यवक्ताही आहे. तो कोणत्याही परिस्थितीत सत्य बोलने पसंद करतो. जेव्हा वसंतसेनेच्या दागिण्याची चोरी होते व विदूषक खोटे बोलून गोष्ट हाताळायला सांगतो तेव्हा 'अहमिदानीमनृतमभिधास्ये' अर्थात मी खरेच बोलतो असे म्हणतो. न्यायालयातही तो खोटे बोलून आपले रक्षण करत नाही.



DO NOT COPY

नाटकाच्या सुरवातीपासूनच चारूदत्त धर्मकर्मामध्ये निरत व्यक्ती दिसतो. तो देवी देवतांच्या पूजा आणि त्यांच्यासाठी बलिदानाच्या कार्यात आळस करत नाही. त्याला आपले नित्य कर्तव्य मानतो. तो संध्यावदंन आणि समाधी इत्यादी करतो. विदूषक धर्माचरणाची टिका करत असताना तो त्याला थांबवत म्हणतो 'वयस्य! मा मैवम, गृहस्थस्य नित्योऽयं विधिः।'

चारूदत्ताला आपल्या कुळाचा मान व प्रतिष्ठा नेहमी राहतो. तो आपल्या कुळाला धक्का लागेल असे आचरण करत नाही. तो गुणग्राही असून त्याला वीणा खूप पसंद आहे. तो उच्च कोटीचा प्रेमी आहे. तो गणिकावर प्रेम करतो पण प्रेमासाठी तीच अगोदर पाउल उचलते. यासोबतच तो पत्नीचे महत्व समजतो आणि पुत्रवत्सल आहे. तो आदर्श मित्रही आहे.

---

**वसंतसेना**

वसंतसेना नाटकाची नायिका आहे. ती वेश्या नसून सम्मानित व उच्चस्तरीय गणिका आहे. ती उज्जयिनीची खूप वैभवशाली गणिका आहे. चौथ्या अंकात विदूषक तिच्या भवनाला कुबेराचे भवन म्हणून वर्णन करतो. तिला धनाचे लालच नाही. शकाराव्दारा पाठवलेल्या दहा हजार सुवर्णमुद्राच्या बदल्यात ती त्याच्याकडे जायला तयार होत नाही. ती संवाहकाला त्याच्या कर्जदारापासून मुक्त करते.

ती अतिशय प्रतिभाशाली गणिका आहे. तिला विविध कलांचे चांगले ज्ञान आहे. कोणत्याही गोष्टीचे तात्पर्य लगेच समजते. व्दितीय अंकात चारूदताविषयी बोलताना आपली बुद्धिमता प्रकट करते. चौथ्या अंकात मदनिका आणि शार्विलक यांचे बोलणे लपून ऐकून त्याचा लगेच तात्पर्य समजते. पाचव्या अंकात विटने तिची कलाभिज्ञता स्पष्ट करतो की 'सकलकलाभिज्ञायाः न किंचिदपि उपदेष्टव्यमस्ति।'

तिच्यामनामध्ये चारूदत्ताविषयी अतुट प्रेम भावना आहे. कामदेवायतन उद्यानात जेव्हा ती चारूदत्ताला पाहते तेव्हापासून त्याच्यावर आसक्त होते. ती कोणत्याही किमतीवर चारूदत्ताला प्राप्त करू इच्छिते. त्याचा सेवक असल्यानेच संवाहकाला कर्जमुक्त करते. आपले दागिणे चारूदत्ताकडे ठेव म्हणून यासाठीचे ठेवते की त्याला पुन्हा पुन्हा भेटता यावे. कर्णपुरकाकडे मिळालेला दुपट्टयावर चारूदत्ताचे नाव पाहून ती स्वतः पांघरते. शकारापुढे

DO NOT COPY

आपल्या प्रेमाचे स्पष्टपणे समर्थन करण्यामुळेच तो तिचा गळा दाबतो. शेवटी फासावर चढवल्या जाणा—या आपल्या प्रियकराला वाचवण्यासाठी खूप प्रयत्न करते.

वसंतसेनाचे चारूदत्तावर असीम प्रेम असूनही ती त्याची पत्नी धूताचाही सन्मान करते. चारूदत्ताला दिलेल्या आपल्या चोरी गेलेल्या दागिण्याच्या बदल्यात तो पत्नी धूताची रत्नावली वसंतसेनेला देतो पण ती धूताची रत्नावली वापस करण्यासाठी स्वतः त्याच्या घरी जाते. दहाव्या अंकात पती मरण पावला म्हणून अग्निप्रवेश करू पाहणा—या धूताजवळ ती स्वतः जाते चारूदताला जिवंत व वसंतसेनेला सोबत पाहून अग्निप्रवेश थांबवणारी धूता तिला म्हणते की, 'दिष्ट्या कुशलिनी भगिनी।'

वसंतसेना गणिका असल्याने पूत्रसुखापासून वंचित आहे पण तिच्यातही स्त्री सुलभ वात्सल्य विद्यमान होते. प्रथम अंकात चारूदत्ताचा पुत्र रोहसेन याची ओळख होते. सहाव्या अंकात रडणा—या रोहसेनाला रदनिका तिच्याजवळ देते तेव्हा तिचे वात्सल्य उचमळून येते. हाथ पसरून ती 'एहि मे पुत्रक! आलिंग।' म्हणून त्याला आपल्या मांडीवर घेते. त्याच्या बालवाणीने मुग्ध होउन जाते. एवढेच काय तर त्याची मातीच्या गाडीच्या बदल्यात सोन्याची गाडी खेळण्याची जिद्द आपले दागिणे देवून करते.

वसंतसेना गणिका असूनही धार्मिक होती. ती दररोज स्नान व देवार्चन करायची. याप्रमाणे वसंतसेना एक अनुपम सुंदरी, उदार, सरल, भावूक, मोठ्यांचा सन्मान करणारी, लहानावर प्रेम करणारी, सर्वांचे सुख दुख समजणारी, उत्कट प्रेमिका व कुलीप स्त्रियाप्रमाणे आचरणाचा प्रयत्न करणारी नायिका आहे.

---

**शकार**

शकार नाटकातील खलनायक आहे. त्याचे आचरण पाहून नीच कुलोत्पन्न असल्याचे वाटते. तो राजा पालक याच्या रखेल असलेल्या स्त्रीचा भाऊ आहे. यामूळे त्याला राजाचा मेहुणा असल्याचा घमंड असतो. आपल्या संबंधाचा दूरपयोग करण्यात याला कधीही काही वाटत नाही. हा अवगुणांची खाण आहे. वसंतसेनेला कोणत्याही किमतीवर प्राप्त करू इच्छितो.

वास्तविक हा महामूर्ख आहे पण आपले शहाणपण दाखवण्यासाठी खूप असंगत पौराणिक गोष्टी करतो. अत्यंत डरपोक असूनही आपल्या बहाद्दुरीचे गोडवे गातो. स्त्रियांना मारण्यात आपली शूरता समजतो. तो म्हणतो 'स्त्रीणां शतं मारयामि। शूरोऽहम्।' आठव्या



DO NOT COPY

अंकात तो बौद्ध भिक्षुला मारतो. वसंतसेनाचा गळा दाबतो व चारूदत्ताला फासावर चढवण्याचा प्रयत्न करतो. याप्रमाणे तो धूर्त, मूर्ख, दुष्ट व घमंडी पात्र आहे.

---

●●●

DO NOT COPY

## मुद्राराक्षसम् –विशाखादत्तम्

**विशाखादत्तचा परिचय –**

संस्कृत साहित्यात विशाखादत्तची प्रसिद्धी मुद्राराक्षस नाटकामुळेच आहे. मुद्राराक्षसच्या प्रस्तावनेमध्ये यांचे नाव विशाखदत्त आले आहे. काही पांडूलिपीमध्ये विशाखदेवही मिळते. याच प्रस्तावनेनुसार ते सामंत बटेश्वरदत्तचे नातू आणि महाराज भास्करदत्तचे पुत्र होते.

विशाखादत्त चंद्रगुप्त विक्रमादित्याचे आश्रित सामंत होते. त्यांचे निवासस्थान पाटलिपुत्र अर्थात सध्याचे पटना च्या जवळील मगध किंवा गौड देश असावा. यांनी चार नाटकांची रचना केली. ते म्हणजे राघवानंद नाटक, अभिसारिकावंचितकम्, देवीचंद्रगुप्तम् आणि मुद्राराक्षसम्.

अंत व बाह्य प्रमाणाच्या आधारावर विशाखादत्तचा काळ चौथ्या शताब्दीचा उत्तरार्ध आणि पाचव्या शताब्दीचा पूर्वार्ध मानला जातो.

**नाटकाचा परिचय –**

हा नाटक सात अंकामध्ये बद्ध आहे. याची कथावस्तू ऐतिहासिक आहे. आचार्य धनिकाने ही कथावस्तू प्रख्यात कोटीची मानून तिचे मूळ स्त्रोत बृहत्कथेला मानले आहे. नाट्यशास्त्रीय दृष्ट्या अतिशय उत्कृष्ट असलेल्या या नाटकाचा मुख्य अंगी रस वीर आहे. तसेच रौद्र, भयानक आणि करूण रसाचाही चांगला परिपाक झालेला आहे.

**नाटकाची कथावस्तु–**

मुद्राराक्षसची कथावस्तू ऐतिहासिक आहे. याचा संबंध मौर्य काळाशी आहे. आचार्य चाणक्याने नऊ नंदांचा नाश केला आहे. नंदवंशाचा शेवटचा राजा चाणक्याच्या कूटनीतिमुळे वनात गेला व पाटलिपुत्रवर चंद्रगुप्ताचे शासन आहे. पण नंदाचा स्वामीभक्त अमात्य राक्षस हा अजूनही नंदवंशाच्या विनाशाचा बदला घेण्यासाठी चाणक्य व चंद्रगुप्ताशी संघर्ष करीत आहे. चाणक्य त्याच्या एक एक योजना ध्वस्त करतो. तो राक्षसाचे हृदयपरिवर्तन करून त्याला चंद्रगुप्ताचा अमात्य बनवू इच्छितो.

राक्षस चंद्रगुप्ताच्या हत्येसाठी विषकन्या पाठवतो. पण त्याच विषकन्याव्दारे म्लेच्छ राजा पर्वतकाची हत्या करवून नगरात राक्षसाची बदनामी करतो. पर्वतक पुत्र मलयकेतूला धोका असल्याचे सांगून पाटलिपुत्रच्या बाहेर काढतो. चंद्रगुप्तावर पाडण्यासाठी

राक्षस दारूवर्माव्दारा कच्चे तोरण बनवतो. पण ते चाणक्याच्या दक्षतेमूळे पर्वतकाचा लहान भाऊ वैरोचकावर पडते व चंद्रगुप्त वाचतो. तसेच राक्षस चंद्रगुप्ताला विषही देण्याचा प्रयत्न करतो पण चाणक्यामूळे त्याचं सर्व प्रयत्न विफल होतात व राक्षसाचेच सहकारी मारले जातात.

चाणक्याला आपला गुप्तचर निपुणकाकडून समजते की क्षपणक जीवसिद्धी, राक्षसाचा मित्र शकटदास आणि सेठ चंदनदास हे तिघे पाटलिपुत्रमध्ये त्याचे शत्रू आहेत. निपुणक राक्षसाची एक अंगुठीही चाणक्याला देतो जी की त्याला सेठ चंदनदासाच्या घराबाहेर पडलेली मिळाली होती. कारण चंदनदासाच्या घरीच राक्षसाची पत्नी व मुलगा लपून राहत होते.

अंगुठी मिळाल्यावर चाणक्य म्हणतो की आता तर राक्षस माझ्या मुठीमध्ये आला. या अंगुठीचा उपयोग चाणक्य राक्षसाला पकडण्यासाठी करतो म्हणून नाटकाचे नाव मुद्राराक्षस ठेवण्यात आले आहे.

निपुणकाने शकटदासासोबत मैत्री केली आहे. चाणक्य निपुणकाकाडून शकटदासाच्या हाताने एक पत्र लिहायला लावतो, क्षपणक जीवसिद्धीला नगरातून हाकालण्याची घोषणा करतो.(तसे क्षपणक वास्तवात त्याचाच मित्र विष्णुशर्मा आहे.) तो शकटदासाला फासीवर चढवण्याचा आदेश देतो. याचवेळी चंद्रगुप्त पर्वतकाचे श्राद्ध करतो आणि चाणक्य श्राद्धाच्या दानामध्ये पर्वतकाचे दागिने आपल्याच ब्राह्मणवेषधारी गुप्तचरांना द्यायला लावतो. पुन्हा हे दागिने राक्षसाला विकले जातात. चाणक्याचा गुप्तचर सिद्धार्थक फासावर चढवल्या जाणा–या शकटदासाला वाचवून पळून जातो व राक्षसाला भेटतो. राक्षस सिद्धार्थक वर एवढा प्रसन्न होतो की तो मलयकेतूव्दारा भेट दिलेले त्याचा पिता पर्वतकाचे दागिने काढून सिद्धार्थकाला देतो. सिद्धार्थकही राक्षसाच्या त्याच अंगुठीची मुद्रा (छाप) लावतो जी चंदनदासाच्या घराबाहेर मिळाली होती. ते दागिने राक्षसाजवळ धरोहर ठेवतो.

राक्षस चाणक्य व चंद्रगुप्तामध्ये फुट पाडण्याचा प्रयत्न करतो. ही गोष्ट चाणक्याला अगोदरच कळाल्याने तो चंद्रगुप्ताशी खोटे भांडणे करतो आणि चंद्रगुप्त चाणक्याला अमात्य पदावरून हटवण्याची घोषणा करतो.



DO NOT COPY

इकडे चाणक्याचा गुप्तचर भागुरायण राक्षराच्या विरूद्ध मलयकेतुचे कान भरतो. तो मलयकेतुला समजावून देतो की राक्षसाची रूची मलयकेतुला राजा बनवण्याची नाही तर चाणक्याला हटवून स्वतः चंद्रगुप्ताचा मंत्री बनण्याची आहे. मलयकेतुच्या मनात संदेह निर्माण होतो. जेव्हा चाणक्य व चंद्रगुप्त यांच्यात फुट पडल्याचे कळते तेव्हा त्याचा संदेह आणखी पक्का होतो.

यानंतर सिद्धार्थक राक्षसाजवळील त्याच्याच अंगुठीने मुद्रीत दागिण्याची बंद पेटी घेऊन शकटदासाच्या हाताने धोक्याने लिहलेले पत्र घेऊन मुद्दाम मलयकेतुच्या शिबीरातून जातो व जाणीवपूर्वक सापडला जातो. मार खात तो सांगतो की राक्षसाने दागिण्याची पेटी चाणक्यासाठी पाठवली होती. शकटदासाच्या हाताने लिहलेल्या पत्राला मलयकेतु राक्षसाकडून चंद्रगुप्ताला लिहलेले पत्र असल्याचे समजतो. तो राक्षसाशी भांडण करतो आणि पत्राला खरे मानून आपल्या ख–या सहयोगी पाचही राजांना विश्वासघाती समजून मारून टाकतो.

चाणक्याच्या कुटनीती आणि दूरदर्शीपणासमोर संपूर्णपणे परास्त झालेला राक्षस हताश होऊन आपला मित्र चंदनदासाला फासीपासून वाचवायला पाटलिपुत्र येतो आणि चाणक्याने फसवलेल्या जाळ्यात असा फसतो की आत्मसमर्पणाशिवाय त्याच्याकडे काहीही उपाय नसतो.

---

**पात्रपरिचय**

**चाणक्य**

विशाखादत्तच्या मुद्राराक्षस नाटकातील सर्वात महत्वाचे व मुख्य पात्र म्हणजे चाणक्य होय. नाटकाच्या नायक म्हणून तो धीरोदात्त कोटीचा नायक आहे. चाणक्य नाटकात प्रथम, तृतीय व सप्तम अंकात रंगमंचावर उपस्थित होतात. प्रथम अंकात त्यांच्या राजनीतिक जीवनाचा प्रारंभ होता. तृतीय अंकात राक्षसाला प्रताडीत करण्यासाठी चंद्रगुप्ताशी खोटे भांडण करतो. तर सातव्या अंकात चाणक्याची सफलता, राक्षसाची असफलता व राक्षसाव्दारा चंद्रगुप्ताचे मंत्रीपद ग्रहण करण्याचे वर्णन आहे.



DO NOT COPY

चाणक्य चंद्रगुप्ताचे मंत्रीपद स्वीकारल्यावर साधारण जीवन व्यतीत करतात. त्यांच्या या ऐश्वर्यभोगात अनासक्तीच असते. ते नगराच्या दूर निवास करतात. ते पुरूषार्थी आहेत. भाग्यवादी व भावूक नाहीत. ते नेहमी अविश्वासी व संशयित वृत्तीचे असतात. त्यांनी आपल्या बुद्धी शिवास कोणावरही विश्वास ठेवला नाही. त्यांच्या मते मूर्ख व्यक्तीच दैवावर विश्वास ठेवतो.

चाणक्य प्रतिशोध व प्रतिहिंसेची साक्षात मूर्ती आहेत. ते नंदकुलाच्या विनाशासाठी प्रतिबद्ध आहेत. त्यांनी आपल्या मोकळे सोडलेल्या केसांना नंदकुलाला कापून खाणारी नागिन म्हटलं आहे. चंद्रगुप्ताशी बोलताना तो भाग्यावादाचे समर्थ करतो म्हणून चाणक्य त्याला रागावतात. चाणक्य चंद्रगुप्ताचा गुरू, मंत्री रक्षक इत्यादी जवळपास सर्वकाही आहे. मौर्य साम्राज्याचा तो शुभेच्छुक आहे.

चाणक्य ब्राह्मण वंशात उत्पन्न, मनोविज्ञानाचा अव्दितीय जाणकार, अत्यंत बुद्धिशाली व धूर्ततेत पूर्ण आहे. चाणक्याने स्वतः राजसत्तेपासून अलग राहून आपल्या बुद्धी व पुरूषार्थाच्या जोरावर नंदवंशाचा नाश करून चंद्रगुप्ताला राजसिंहासनावर बसवले. राक्षसाला पराजित करून त्याचा अमात्य बनविले. चाणक्य आपल्या बौद्धिक क्षमतेपुढे कोणचीही क्षमता स्विकार करीत नाहीत. त्यांच्या कुटनीतिमुळेच त्यांचे गुप्तचर सुद्धा परस्पराला ओळखत नाहीत.

अशाप्रकारे मौर्याचा शुभचिंतक, भयंकर कुटील, चाणाक्ष, दक्ष, भविष्याचा अचुक वेध घेणारा व अत्यंत प्रभावी असा चाणक्य मुद्राराक्षसमध्ये पाहायला मिळतो.

---

**राक्षस**

विशाखादत्तने मुद्राराक्षसमध्ये राक्षसाच्या ज्या व्यक्तित्वाचे आणि आदर्शाचे चित्रण केले आहे ते अव्दितीय आहे. संपूर्ण नाटकात राक्षस एक संघर्षशील व्यक्ती दिसतो. राक्षसाच्या चरित्रात मानवी व्यक्तित्वाचे विविध पैलूचे चित्रण दिसून येतात. राक्षस पुन्हा पुन्हा संकटानी, असफलतेने आणि निराशेने प्रताडीत होऊनही दृढतेने आपल्या लक्ष्याकडे अग्रेसर होत असतो. त्याचे अपराजय व्यक्तीत्व थोडेही संकटानी व असफलतेने पराभूत होत नाही. तो तेव्हांच हारतो जेव्हा मलयकेतू त्याचा त्याग करतो. यामुळे राक्षसाजवळ कोणताही



DO NOT COPY

विकल्प राहत नाही. तिकडे श्रेष्ठी चंदनदासाच्या जीवन मरणाचाही प्रश्न ऐरणीवर आलेला असतो. शेवटी भाग्याने पराजित राक्षस कुसुमपुर प्रस्थान करतो.

राक्षस प्रथम व तृतीय अंकाच्या अतिरिक्त नाटकाच्या सर्वच अंकात उपस्थित आहे. व्दितीय अकांत त्याच्ये राजकीय रूप समोर येते.  चौथ्या अंकात चंद्रगुप्तावर आक्रमण व चाणक्याविरोधात कुटनीतिक योजना करतो. पाचव्या अंकात त्याचे अभियूक्त रूप. सहाव्या अंकात आपल्या योजनामध्ये असफल एकाकी कुसुमपुरच्या उद्यानात असतो. सातव्या अंकात तो चाणक्याच्या सक्षम पराजित होऊन चंद्रगुप्ताचे अमात्यपद स्विकारतो.

राक्षस मित्र वत्सल आहे. मित्रासाठी तो सगळे काही समर्पित करतो. चंदनदासाच्या रक्षणासाठी सर्व सोडून सपर्मित होतो. याची नंदवंशासाठी प्रखर भक्ती आहे. त्याचा एकच उद्देश असतो की येनकेन प्रकारे नंद वंशाचा पुन्हा उद्धार करावा.

तो विस्मरणशील आहे. त्याला गुप्तचराचे नावही विसरतात. तो ज्योतिष्य व शकुनावरही विश्वास ठेवतो. तो आक्रमणासाठी शुभ दिवस विचारतो. नाटकाच्या शेवटी तो असहाय व दीन प्रतीत होतो.

---

●●●

DO NOT COPY

## वेणीसंहार – भट्टनारायण

**भट्टनारायणाचा परिचय–**

वेणीसंहार नाटक ही भट्टनारायणाची एकमेव उपलब्ध कलाकृती आहे. दन्तकथेनुसार भट्टनारायण बंगालनरेश आदिशूर यांचे समकालिन होते. या राजाने कन्नौजहून आपल्या राजधानीत दुष्काळाच्या शांतीसाठी यज्ञार्थ बोलावलेल्या पाच ब्राह्मणापैकी हे एक होते. एका अनुश्रुतीनुसार भट्टनारायण टागोर (ठाकूर) वंशाचे आदिपुरूष होते. आदिशूराने यांना पाच गावे दिले होते. पूढे यांची संख्या वाढून ते एका वंशाचे संस्थापक झाले.

वेणीसंहारच्या प्रस्तावनेत त्यांनी स्वतःला 'मृगराजलक्षा' अर्थात सिंह उपाधीने युक्त म्हटले आहे. ते एक नैष्ठिक आणि विविध शास्त्रातील निपुण ब्राह्मण होते. वैष्णवात त्यांची विशेष आस्था होती.

**काळ–**

ग्रील आणि मॅक्समूलर भट्टनारायणाचा काळ सातव्या शतकाच्या आसपासचा मानतात. अबुफजलच्या राजसूचीनुसार काही विद्वान आदिशूराला आठव्या नवव्या शताब्दीमधील मानून भट्टनारायणाला त्याचा समकालिन मानतात. तर काव्यशास्त्रज्ञ आचार्य वामनाने यांच्या पंक्ती उधृत केल्याने हे निश्चितच आठव्या शतकापूर्वी झाले असावे.

**नाटकाचा परिचय–**

वेणीसंहार प्रख्यात कोटीचा नाटक आहे. यात मूळ महाभारतातील कथा असून भीम उरूभंगाऐवजी वेणीसंहाराची प्रतिज्ञा येथे घेतो. सहा अंकाचा हा नाटक नाट्यशास्त्रीयदृष्टया आदर्श मानला जातो. पहिल्या पाच अंकामध्ये वीररसाऐवजी रौद्र रस प्रधान आहे. सहाव्यात करूण व शेवटी श्रीकृष्णाच्या अवतरणासोबतच शांत रसात पर्यवसान होते. पंरपरागत दृष्टीने युधिष्ठिर याचा नायक मानला जातो.

**कथावस्तु–**

वनवास संपलेले पांडव दुर्योधनाला आपले अर्धे राज्य परत मागतात. येथून प्रथम अंक आरम्भ होतो. पाच गावाच्या बदल्यात संधी करण्यासाठी युधिष्ठिराने कृष्णाला दूत म्हणून पाठविले. हा संदेश सहदेवाच्या तोंडून ऐकून भीमसेन व द्रोपदी क्रोधाने भडकतात. कृष्णाची संधी वार्ता विफल झाल्याचे ऐकून युद्धाची घोषणा केली जाते. येथे प्रथम अंक समाप्त होतो.

DO NOT COPY

दुस–या अंकात अभिमन्युवधाच्या घटनेनंतर दुर्योधन भानुमतीला शोधत उद्यानात येतो. तेथे स्वपत्नी भानुमतीला पडलेल्या स्वप्नाचा वृतांत चोरून ऐकून शंकीत होतो पण पून्हा शंका दूर होते. स्वप्नामध्ये एक नकुल (मुंगुस) शंभर सापाला मारतो व तिचे वस्त्र ओढतो. त्यानंतर मोठे वादळ किवा वावटळ येते दुर्योधन व भानुमती राजमहलात जातात. नेपथ्यात दुर्योधनाच्या रथाची पताका तुटल्याचे कळते. त्यानंतर जयद्रथपत्नी म्हणजे बहीण दुःशला आणि जयद्रथाच्या मातेकडून कळते की अभिमन्युवधाच्या प्रतिशोधार्थ अर्जून जयद्रथाच्या वधाची प्रतिज्ञा करतो.

तिस–या अंकात अश्वथामा द्रोणाचार्याच्या मृत्युमुळे विलाप करतो. त्याची पित्याच्या वधाच्या प्रतिशोधार्थ प्रतिज्ञा आणि कर्णासोबत झालेल्या कलहाचे रोचक चित्रण आहे.

चौथ्या अंकात जखमी दुर्योधनाला भीमाव्दारा दुशासनवधाची बातमी कळते. येथे दुर्योधनाचा करूण विलाप आहे. तसेच कर्ण व त्याचा पुत्र वृषसेन यांचे भीम व अर्जुनासोबत युद्ध व वृषसेनाचा मृत्यु वर्णित आहे.

पाचव्या अंकात दुर्योधन कर्णाच्या सहायतेसाठी युद्धभूमीकडे प्रस्थान करणार असतानाच धृतराष्ट्र व गांधारी त्याला भेटायला येतात. ते त्याला युद्धापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात पण दुर्योधनाचा निश्चय अटळ असतो. यावेळी भीम व अर्जुन त्याला शोधत तेथे येतात. धृतराष्ट्र व दुर्योधनासोबत या दोघांची झटापट होते.

सहाव्या अंकात पहिल्यांदा युधिष्ठिर व प्रथम अंकानंतर पुन्हा द्रोपदी प्रवेश करते. हे दोघेही दुर्योधन लपला असल्याने चिंतीत असतात कारण भीमाने प्रतिज्ञा केली होती की आज तो दुर्योधनाला नाही मारू शकला तर तो प्राण त्याग करेल. खूप शोध केल्यानंतर सरोवरामध्ये लपलेला दुर्योधन सापडल्याची बातमी मिळते. याचवेळी चार्वाक नावाचा राक्षस मुनीवेशामध्ये युधिष्ठिराला ठगण्यासाठी येऊन दुर्योधनाव्दारा भीम मारला गेल्याची खोटी अफवा पसरावतो. इकडे युधिष्ठिराने आपला एकही भाऊ मरण पावला तर तो जीवंत राहणार नाही अशी प्रतिज्ञा केली होती त्यानुसार तो चिता पेटवून द्रोपदीसह प्राण देण्यास तयार होतो. पण याचवेळी भीम दुर्योधनाला मारून तेथे येतो. रक्तामध्ये भिजलेल्या त्याला सर्वजन दुर्योधन समजतात. युधिष्ठिर तर त्याला दुर्योधन समजून व्दंव्द युद्धासाठी तयार होतो. शेवटी सर्वजन त्याला ओळखून आनंदीत होतात. यावेळी श्रीकृष्ण व अर्जुनही तेथे येतात. युधिष्ठिराच्या श्रीकृष्ण स्तुतीसोबत नाटक समाप्त होतो.



DO NOT COPY

**पात्र परिचय**

## भीम

वेणीसंहार नाटकाच्या नायकाविषयी मतभेद असले तरी भीम यालाच नायकाचा मान जातो. कारण संपूर्ण नाटकात त्याचीच भूमिका प्रमुख जास्त आहे. नाटकाच्या सर्व घटनांचे केंद्रस्थान भीमसेनच आहे. भीमसेनच रोष, उत्साह आणि स्फुतीची प्रतिमा आहे.

नाटकाच्या सुरवातीलाच त्याचा प्रवेश कोपाविष्ट मुद्रेमध्ये होतो. तो कोणत्याही किमतीवर एवढेच नाही तर आपल्या मोठ्या भावाची आज्ञा सुद्धा डावलून आपल्या शत्रूचा व द्रोपदीच्या अपमानाचा बदला घ्यायला सिद्ध असतो. युधिष्ठिर त्याला 'प्रियसाहस' म्हणतो.

भट्टनारायणाने भीमसेनाला संघर्षशील व दर्पोन्मत रूपामध्ये चित्रित केले आहे. संपूर्ण नाटकात केवळ व्दितीय अंकात सोडून त्याच्या दर्पोक्ती ऐकायला मिळतात. पाचव्या अंकात धृतराष्ट्र व गान्धारीला प्रणाम करताना त्याचा घमंडी व उद्धट स्वभाव खटकायला लागतो.

## दुर्योधन

वेणीसंहार नाटकात दुर्योधन खलनायकाच्या स्वरूपात रंगवलेला आहे. तो ही भीमाच्या मुकाबल्यात कमी रोषपूर्ण आणि गर्विष्ठ नाही. भट्टनायणाने दुर्योधनाचे चरित्र सुद्धा अतिशय मेहनतीने रंगवलेले आहे. दुस—या अंकात दुर्योधनाचे श्रृंगारी रूप पाहायला मिळते तर संकटात त्याचे बनशाली व गर्वित रूप पाहायला मिळते.

स्वप्नदर्शन व ध्वजभंगाच्या अपशकुनाने घाबरलेल्या भानूमतीला समजावताना तो म्हणतो की, 'त्वं दुर्योधनकेसरीन्द्रगृहिणी शंकास्पद किं तव।' दुर्योधन खरोखर वीर असल्याची वागणूक दाखवतो. तो उघड उघड आपल्या शत्रूचे अहित करण्याचा प्रयत्न करतो. भीमाव्दारा प्रस्ताव ठेवला जातो की त्याने कोणत्याही पांडवाशी व्दन्व्द युद्ध करू शकतो तेव्हा तो भीमासोबत युद्धाची करण्याची मागणी करतो.

ते केवळ अभिमानी आणि गर्विष्ठच नाही तर त्याच्या जीवनातील एका ख—या व भावूक मित्रत्वाचे दर्शनही आपल्याला वेणीसंहारमध्ये पाहायला मिळते. तो अंगराज कर्ण याच्या मैत्री खातर त्याच्या मृत्यूमुळे आपल्या लहान भावाच्या मृत्युचे दुःख विसरून त्याचा बदला घ्यायला सज्ज होतो.



DO NOT COPY

## युधिष्ठिर

युधिष्ठिर याचा नाटकात प्रथम अंकानंतर केवळ सहाव्या अकांतच प्रवेश होतो. याच्या चरित्राला नाटकात खूप कमी स्थान मिळते. तो शांत स्वरूपाचा आणि ज्ञातिक्षयभीरू आहे. तो आपल्या एकाही भावाच्या शिवाय जगु इच्छित नाही. त्याच्यात भ्रातृप्रेम आहे.

---

DO NOT COPY

## रत्नावली – हर्षवर्धन

**हर्षवर्धनाचा परिचय–**

संस्कृत साहित्यात तीन हर्ष प्रसिद्ध आहेत. भरतमुनीच्या नाट्यशास्त्रावर वार्तिक लिहणारे हर्ष, नैषधीयचरितम्चे रचयिता हर्ष आणि तिसरे रत्नावलीकार सम्राट श्री हर्षवर्धन. यांच्या वडिलांचे नाव प्रभाकरवर्धन व आईचे नाव यशोदेवी होते. भाऊ राजवर्धन होता जो पित्यानंतर राजसिंहासनावर बसला होता पण काही दिवसातच मरण पावला. बहीण राजश्री होती. हीची कथा बाणाने आपल्या हर्षचरिताच्या चौथ्या उल्लासामध्ये वर्णन केली आहे. राजा हर्ष यांचा जन्म इ.स. 500 मध्ये झाला होता. राज्यकाळ 606 इ.स. ते 648 पर्यंत होता.

हर्षवर्धन योग्य शासक असूनही साहित्यप्रेमी होते. चिनी यात्री व्हेनसांग यांनी यांचे वर्णन केले आहे. हे बौद्ध धर्माने प्रभावित होऊन शिलादित्य उपनावही धारण केले होते. धावक कवीने यांच्यापासून प्रचूर धन कमाविले होते. काहीजण रत्नावली धावक कवीचीच कृती मानतात जी खूप धनाच्या बदल्यात राजा हर्षाच्या नावाने केली गेली. पण याला ठोस पुरावे नाहीत.

**रत्नावलीचा परिचय–**

राजा हर्षाची रत्नावली ही नाटिका संस्कृत नाट्य साहित्यात इतकी लोकप्रिय झाली की तिच्या आधारावर नंतरच्या अनेक नाटककारांनी नाटिका लिहल्या. ही गुणाढ्याच्या बृहत्कथेतील उदयन कथेवर आधारित चार अंकाची नाटीका आहे. यात श्रृंगार रस प्रधान आहे. याची कथावस्तू महाकवि कालिदासाच्या मालविकाग्निमित्रम् पासून खूप प्रभावित आहे.

**कथावस्तू–**

यात सिंहलराजकन्या रत्नावली आणि उदयन यांच्या प्रेम विवाहाची कथा वर्णीत आहे. यातील मुख्य पात्र यौगंधरायण लावाणक गावात वासवदत्ता जळाल्याची खोटी बातमी पसरावून रत्नावलीला उदयनाशी विवाह करण्यासाठी मागणी करतो. कारण ज्योतिष्यांच्या भविष्यवाणीनुसार रत्नावली उदयनाची पत्नी होईल आणि तो चक्रवर्ती राजा होईल.

दुर्दैवाने रत्नावलीला घेऊन येणारा जहाज मोडतो व रत्नावली लाकडाच्या आधाराने वाचते आणि यौगन्धरायणाच्या जवळ आणली जाते. सागरापासून मिळाली असल्याने तिला सागरिकाही म्हटले जाते. यौगन्धरायण तिची ओळख लपवून वासवदत्तेजवळ ठेवतो व वाट पाहतो की उदयन स्वतः तिच्याकडे आकर्षित होईल. येथून नाटकाची सुरवात होते.

DO NOT COPY

पहिल्या अंकात सागरिका (रत्नावली) कामदेव पूजेच्या वेळी राजा उदयनाला पाहून त्याच्यावर अनुरक्त होते. येथेच तिला हेही माहीत होते की याच उदयनासाठी पिता सिंहलराजाने तिला पाठवले होते. या अंकात नायिका रत्नावलीच्या हृदयात प्रेमाचे बीज अंकुरित होते.

दुस–या अंकाच्या आरंभी प्रवेशकात सागरिकाच्या विरहविव्हळेचा संकेत मिळतो. चित्र काढण्यासाठी ती कदलीगृहात बसून उदयनाचे चित्र काढते. तिची मैत्रिण सुसंगता तिच्या मनातील गोष्ट समजते. पण सागरिका लपवण्याचा प्रयन्त करूनही लपवू शकत नाही. तिची मैत्रिण सुसंगता त्याच चित्रात सागरिकेचेही चित्र बनवते. सागरिकाला सुसंगतापूढे आपल्या प्रेमाचा स्विकार करावा लागतो. या दोघीतील बोलणे पिंज–यातील एक मैना कंठस्थ करते ज्या मैनेची जबाबदारी वासवदत्तेने सागरिकाकडे सोपवली होती. याचवेळी अश्वशाळेतील सुटलेला एक दुष्ट वानर तिथे येऊन पिंजरा उघडून पळून जातो. वानराच्या गोंधळामुळे सागरिका व सुसंगता चित्रफलक तेथेच सोडून पळून जातात. इकडे पिंज–यातून पळालेली मैना या झाडावरून त्या झाडावर उडत उडत सागरिका व सुसंगताचे बोलने दोहरू लागते ज्याला उद्यानात फिरत  असणारे राजा उदयन आणि विदूषक वसंतक ऐकतात. पुन्हा त्या दोघांना उद्यानात ते चित्रफलकही  मिळते, ज्यावर सागरिकाने राजाचे व सुसंगताने सागरिकाचे चित्र बनविले होते. थोड्यावेळात सुसंगता तिथे चित्रफलक न्यायला येते. राजाला चित्रफलक पाहत असल्याचे पाहून सागरिकाविषयी सांगते. ती सागरिकाला भेटवण्यासाठी जवळच्या लताकुंजात राजाला घेऊन जाते. यावेळी वासवदत्ता तेथे येऊन चित्रफलकातील राजा व सागरिकाला पाहते आणि उदयन व सागरिकेचे मिलनही पाहते. वासवदत्ता रागाने भडकते व खूप विनवनी करणा–या राजाची उपेक्षा करून तिथून निघून जाते.

तिस–या अंकात सुसंगता राणी वासवदत्ताने पुरस्कारात दिलेल्या कपडयांनी सागरिकेला वासवदत्तेच्या वेशात सजवते आणि स्वतः वासवदत्तेच्या विशेष दासी असलेल्या कांचनमालेच्या वेशात सजते. ती सागरिकेला राजाशी भेटण्यासाठी घेऊन जाते. पण वासवदत्तेला सुसंगताच्या या षडयंत्राची भनक लागते आणि ती दासी कांचनमालाला घेऊन त्यांच्या मिलनस्थळी जाते. वेषपरिर्वतनाने सगळा गोंधळ उठतो. राजा उदयन वास्तविक वासवदत्तेला सागरिका समजून तिच्यापूढे प्रेमनिवेदन करतो. वासवदत्ता प्रकट झाल्यावर

राजा क्षमायाचना करतो पण ती शिव्या देत निघून जाते. या सर्व गोष्टी जाणून सागरिका हताश होऊन स्वतःचा गळा लतापाशाने घोटून मरण्याचा प्रयत्न करते पण राजा तेथे येऊन तिला वाचवतो. पुन्हा वासवदत्ता येऊन सागरिकाला घेऊन जाते.

चौथ्या अंकात एक खोटी बातमी पसरावली जाते की सागरिकाला उज्जयिनी पाठवले गेले आहे. पण वास्तविक सागरिकाला वासवदत्ता तळगृहातील कारागृहात टाकते. एक जादूगर राजा समोर आपला खेळ दाखवतो. यावेळी अंतःपुरातील प्रासादामध्ये आग लागते. वासवदत्ता घाबरून राजाला सांगते की सागरिका त्याच प्रासादामध्ये बंद आहे. राजा सागरिकाला वाचवतो. याचवेळी सिंहल देशाचे मंत्री वसुभूती आणि कांचुकी वाभ्रव्य तिथे येतात आणि आपल्या राजकुमारीला ओळखतात. जादूगर वेषातील यौगंधरायण ही वास्तविक रूपात समोर येतो. वासवदत्ता सागरिला राजाकडे सोपवते व राजा व सागरिकाच्या मिलनाने नाटक समाप्त होते.

---

**पात्रपरिचय**

**उदयन**

रत्नावली या नाटिकेचा नायक म्हणून उदयनाचे पात्र आपल्या समोर येते. नाट्यशास्त्रीय दृष्टया तो एक धीरललीत नायक आहे. तो कोमल स्वभावाचा, हृदयाने भावूक, प्रेमी, वीर व कुशल अनुरागी आहे. या नाटिकेत उदयनाचे चरित्र संक्षिप्त रूपात चित्रित आहे. सागरिका आणि उदयनाच्या पारस्पारिक प्रणय प्रसंगी तो भावूकतेने समोर येतो. हा प्रसंगही केवळ दोन दिवसाचा आहे.

त्याचे हृदय प्रेमाचा अगाध सागर आहे. तो रात्र दिवस आपल्या प्रेयसी सागरिकाच्या ध्यानात मग्न असतो. सागरिकाचे चित्र आपल्या अंतःकरणात बनवतो. तो एवढा ध्यानमग्न होतो की उपवनामध्ये वेलींना हलवताना पाहून त्यातही आपल्या प्रेयसीच्या लक्षणांना शोधतो. वत्सराज उदयनाचे प्रेम चौर्य प्रेम नव्हते. तो भयातूरही होत नाही.

राजा उदयनाच्या हृदयात कोमलतेसोबतच औदार्य सुद्धा दिसून येते. तो प्रद्योत कन्या वासवदत्तेसोबत अतिशय औदार्याने वागतो. तो वासवदत्तेच्या हृदयाला खिन्न न करता सागरिकेला प्रेम करतो. सागरिकाला प्रेम करताना भयभीत होतो आणि ती रागावल्यावर



DO NOT COPY

तिला मनवन्यासाठी प्रयत्न करतो. तो सागरिकासोबत विवाह करण्यापूर्वी संतुष्ट वासवदत्तेची परवानगी घेतो. यामुळे तो एक खरा प्रेमी सिद्ध होतो.

नाटककार हर्ष यांनी उदयनाला प्रामुख्याने प्रेमी रूपात साकारले आहे. यासोबतच तो योग्य शासकही आहे. तो आपला एक मंत्र्याव्दारा केलेल्या कार्यावर आश्चर्य व्यक्त करतो. यावरून त्याच्या आज्ञेशिवाय कोणीही नवे कार्य करत नसत असल्याचे स्पष्ट होते.

**रत्नावली**

या रत्नावली नाटकाची नायिका रत्नावलीच आहे. ती सागरातून प्राप्त झाली असल्याने तिला नाटकात सागरिका नावाने संबोधले आहे. ती नाट्यशास्त्रीय दृष्टीने मुग्धा नायिका आहे. ती अप्रतिम सुंदरी आहे. तिच्या सौंदर्यामूळेच राजा तिच्या प्रेमामध्ये पडतो व तिच्यासाठी वेडापिसा होतो. तिचेही ह्रदय प्रेमाच्या सागरामध्ये डूबक्या घेते. ती भावूक आहे. तिला कुलिनतेवर अभिमान वाटतो.

**वासवदत्ता**

वासवदत्ता राजा उदयनाची प्रधान महाराणी आहे. ती कोमल स्वभावाची आणि प्रेमळ ह्रदयाची आहे. राजा उदयन तिचा अतिशय सन्मान करतो. ती राजाच्या विलासी स्वभावाशी परिचित आहे. तिच्यातही स्त्रीसुलभ सपत्नी दाह विद्यमान आहे. तिला वाटत नाही की तिचा पती अन्य स्त्रीशी प्रेम करावा.

ती जरी सागरिकाच्या उद्धटपणामूळे तिला बंदीगृहामध्ये बंद करून ठेवते पण त्याला आग लागल्यावर धाबरून दयार्द्र वासवदत्ता तिला वाचवण्याची राजाला प्रार्थना करते. तिला राजा व सागरिकाचे प्रेम मान्य नव्हते पण जेव्हा तिला कळते की राजा सागरिकाशिवाय सुखी राहू शकत नाही ती सागरिका ही राजा प्रदान करते.

---

●●●

DO NOT COPY

## मालतिमाधवम् – भवभूति

### भवभूतिचा परिचय–

भवभूति संस्कृतच्या सर्वात महान नाटककारांपैकी एक आहेत. यांची तीन नाटके प्रसिद्ध आहेत. महावीरचरितम, मालतिमाधवम् व उत्तररामचरितम्. या नाटकांच्या प्रस्तावनेमध्ये भवभूतिने आपला परिचय सूत्रधाराच्या माध्यमातून दिला आहे. यांचे पूर्वज विदर्भाच्या पद्मपूर (डॉ. मिराशीनुसार सद्याचे आमगांव) नगरात राहत होते. ते कश्यप गोत्रीय यजुर्वेदाच्या तैत्तिरिय शाखेचे ब्राह्मण होते. ज्ञानसाधनेमुळे यांच्या कुळाची खूप ख्याती होती. अशा कुळात भट्टगोपालचे नातू व नीलकंठाचे पुत्र म्हणून भवभूति जन्माला आले. यांच्या मातेचे नाव जतुकर्णी होते. श्रीकंठ हे त्यांचे नाव होते की उपाधि यावर मतभेद आहेत.

यांनी आपल्या गुरूचे नाव 'ज्ञाननिधी' सांगितले आहे व त्यांना यथार्थनामा म्हटले आहे. कदाचित ते तारूण्यात विदर्भातील आपले गाव सोडून मध्यदेशात पद्मावतीला (सद्याच्या ग्वालियार जवळील पवाया नावाचे गाव) आले. जेथे कालप्रियनाथाचे प्रसिद्ध मंदिर होते. (याविषयीही मतभेद आहेत) या मंदिराच्या यात्रा महोत्सवात यांच्या तीनही नाटकाचे प्रयोग झाले. नाटक करणा–या सोबत यांची चांगली मैत्री होती. मालतिमाधवम्च्या प्रस्तावनेमध्ये सूत्रधार भवभूतिला आपला चांगला मित्र म्हणतो. त्यांच्या या कार्यामुळे त्यांची स्वकियाकडून उपेक्षा झाली होती.

भवभूति कान्यकुब्जचे राजा यशोवर्माचे समकालिन होते. पण ते त्यांचे आश्रित होते की नाही याबाबत वाद आहेत. आठव्या शतकातील आचार्य वामनाने आपल्या काव्यालंकारसूत्रवृत्तीमध्ये भवभूतिचे पद्य उधृत केले आहेत. यावरून भवभूतिंचा काळ सातव्या शताब्दीचा पूर्वार्धापासून आठव्या शताब्दीच्या पूर्वार्धादरम्यान मानला जातो.

### मालतिमाधवम्चा परिचय–

भवभूतिच्या तीन नाटकापैकी मालतिमाधवम हे प्रथम नाटक आहे. हे दहा अंकाचे प्रकरण आहे ज्यात कल्पित कथेला आधार बनवून भवभूतिने नाटक रचले आहे. कथेतील

DO NOT COPY

मुख्य घटना व रूढी बृहत्कथेत पाहायला मिळतात. यात विदर्भाचा राजमंत्री देवरात पुत्र माधव नायक व पद्मावतीचा राजमंत्री भूरिवसु याची कन्या माधवी नायिका आहे.

**कथावस्तू –**

देवरात व भूरिवसु विद्यार्थी जीवनापासूनच चांगले मित्र होते. या दोघांनी प्रतिज्ञा केली होती की आपल्या मुला मुलींचा परस्परांशी विवाह करावा. कालांतराने देवरातला माधव नावाचा पुत्र व भुरिवसूला मालती नावाची पुत्री झाली. देवरात आपल्या माधव नावाचा मुलाला न्यायशास्त्राचे अध्ययन करण्यासाठी याच हेतुने पद्मावती पाठवतो. बौद्ध भिक्षुणी कामंदकी जी की भूरिवसु व देवरातची सहाध्यायी होती ती माधव व माधवी यांचे प्रेम व्हावे यासाठी विविध उपाय करते. ती माधवाला दररोज भूरिवसुच्या घरापूढून फिरायला लावते. माधवी व माधव परस्पराला पाहून एकमेकाकडे आकर्षित होतात. राजाचा नर्मसचिव नंदन त्यांच्या प्रेमात बाधा आहे. तो राजाच्या माध्यमाने भूरिवसुवर दबाव टाकतो की माधवीचा विवाह नंदनशी लावावा. भुरिवसू अडचणीत सापडतो पण कामंदकी हे सारे विघ्न दूर करून माधव व मालतीचा विवाह देण्याचा प्रयत्न करते.

दुस–या बाजूला नंदनची बहीण मदयंतिका माधवचा मित्र मकरंदवर प्रेम करते. मकरंद एकदा सिंहाव्दारा आक्रमण झाल्यावर आपले प्राण संकंटात टाकून तिला वाचवितो. माधव मालतीला प्राप्त करण्यासाठी श्मशान साधना करण्यासाठी श्मशानात जातो. तेथे करालायतन किंवा काली देवीच्या मंदिरातून मालतीची किंचाळी ऐकून तलवार काढून मंदिरात पोहचतो. एक अघोरघंट नावाचा कापालिक आपली सहायिका कपालकुंडलेच्या मदतीने मालतीचे अपहरण करतो. तो तिचा बळी देणार होता. माधव कापालिकाला मारून टाकतो. यानंतर कामंदकीच्या मदतीने मालती माधव सोबत मंदिरात गुपचुप विवाह करते. येथे राजाच्या सैनिकासोबत माधव व मकरंदचे युद्ध होते. दोघेही खूप वीरतेन सामना करतात. याचवेळी कपालकुंडला पुन्हा मालतीचे अपहरण करते. माधव व्याकूळ होऊन मालतीला शोधतो. कामंदकीची मैत्रिण सौदामिनी जी स्वतः तांत्रिक आहे. ती आपल्या तंत्रविद्येने मालतीचे रक्षण करते आणि आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात असणा–या माधवाला ऐनवेळी वाचवते. शेवटी मालतीचे माता पिता आणि राजा मालती माधव आणि मकरंद मदयंतिकाचा विवाह स्विकार करतात. येथे नाटक संपते.

## पात्र परिचय

### माधव

विदर्भराज देवरातचा पुत्र  माधव नावाचा हा मालतिमाधवम् या नाटकाचा नायक आहे. हा ब्राह्मण जातीचा सुंदर युवक ललीत कलाप्रेमी, सहृदय व सद्‌गुणांची खान आहे. त्याच्यात लोकोत्तर गुण आहेत. त्याच्याजवळ कामदेवाप्रमाणे अव्दितीय आकर्षक यौवन आहे. याच कारणामुळे मालती राजमार्गावर पर्यटन करताना त्याच्या आकृष्ट होते. सौंदर्यासोबत त्याच्यात गुण आहेत. आपल्या चांगल्या गुणांमूळेच तो कांमदकीचे वात्सल्यपूर्ण प्रेम अर्जित करतो.

माधव एक साहसी व वीर पुरूष आहे. ज्यावेळी उद्यानामध्ये सिंहाव्दारा उपद्रंव होण्याची सूचना मिळते त्यावेळी तो त्याचा सामना करण्यासाठी तत्परतेने धावतो. परन्तु त्याचा मित्र मकरंद अगोदरच त्या सिंहाला मारलेला असतो.  कृष्णपक्षाच्या चतुर्दशीला तो एकटाच रात्री श्मशानात जाऊन प्रचंड व अघोरघण्ट तांत्रिकाचा कपालकुंडलेच्या समोर वध करतो. नगररक्षक त्याचा मित्र मकरंद याला पकडल्यावर त्याचे रक्षण करण्यासाठी सैनिकासोबत असा पराक्रम करतो की राजाही प्रसन्न होतो.

माधव विविध कलामध्ये निपूण आहे. तो चित्रकलेसोबतच कवी कर्मातही निपूण आहे. तो मालती असीम सौंदर्याला आपल्या चित्रातून प्रदर्शित करतो. तसेच आपल्या हृदयातील अनिर्वचनीय अभिव्यक्तीला तो एका पद्यात लिहून अभिव्यक्त करतो.

पद्मावतीमध्ये मालतीच्या प्रेमाचा विषय बनतो. प्रथम अंकात तो मालतीच्या सौंदर्याकडे आकर्षित होतो. तिच्यासाठी सर्वस्व अर्पण करायला तयार असतो. ता तिचा एकनिष्ठ प्रेमी आहे. तो तिच्या प्रेमामध्ये आपल्या शरीराची सुधबुध विसरून जातो.  तिच्या प्राप्तीसाठी बीभत्स कार्य करायला मागे पुढे पाहत नाही. आपली आशा पूर्ण होण्याच्या संभावनेने तो श्मशानामध्ये पिशाचाचे नरमांस विकायलाही मागे पुढे पाहत नाही.

मालतीच्या प्रेमामध्ये करूण अवस्थेची चरम सीमा दिसून येते. तो विन्ध्यपर्वताच्या सघन वनामध्ये फिरत असतो. त्याला तन मनाची सुध राहत नाही. तो जड व चेतनाचा फरक करायलाही असमर्थ ठरतो. यामूळेच कधी मेघांना, कधी विद्युत, कधी कोकीलेला तर कधी वृक्षांना मालती विषयी विचारतो. प्रत्युत्तर मिळत नसल्याने तो बेहोश होतो.  त्याच्या



DO NOT COPY

प्रत्येक वाक्यात विरहदशा दिसून येते. नाट्यशास्त्रीय दृष्टया माधव धीरप्रशांत प्रकारचा नायक आहे.

---

## मालती

मालतिमाधवम् या नाटकाची मालती नायिका आहे. तिचे पात्र नाटकात प्रमुख पात्र म्हणून असल्याचे दिसून येते. ती पद्मावतच्या भुरिवसूची कन्या होती. ती सौंदर्याची अधिष्ठात्री देवता आहे. माधव तिच्या सौंदर्याचे वर्णन करतो की, ती कुमारी सौंदर्याकरची अधिदेवता किंवा सौंदर्याच्या श्रेष्ठ अंशाच्या समूदायाची भवनरूप आहे. हे मित्रा निश्चितच चंद्रकला, मृणाल आणि चंद्रिका इत्यादी तिच्यामूळेच आहेत आणि कामदेव तिचे रचनाकार आहे. मालतीची शरीरकांती लोध्रपुष्पाप्रमाणे, डोळे हरणांप्रमाणे, गती हाथीप्रमाणे आणि नम्रता वेलीप्रमाणे आहे.

तिच्या ह्रदयात माता पित्याविषयी सन्मान आहे. अनुपम सौंदर्य व माधवाविषयी असीम प्रेम असूनही ती आपल्या पित्याचा आदर ठेवते. तिला जरी पित्या राजाच्या सांगण्यावरून विवाह नंदनशी लावावा हे सहन होत नाही तरीही ती पित्याच्या आज्ञेची अवहेलना करीत नाही. माता पित्याच्या सुखासमोर तिला आपल सुखदुखाचे ध्यान असत नाही. ती म्हणते की, माझे पिता तर प्रिय आणि प्रशंसनीय आहेत. ती कुलकन्येच्या प्रतिकूल साहस करू इच्छीत नाही.

मालतीच्या चरित्रामध्ये शालीनता दिसून येते. कामंदकीव्दारा माधवाप्रती समर्पण प्रसंगी तिची शालिनता प्रकट होते. माता पित्याविषयी श्रद्धा, माधवविषयी अपार प्रेम व कर्तव्यात खूप संघर्ष असलेले तिचे जीवन दिसून येते. कामंदकी तिला दुष्यन्त शकुन्तला इत्यादी कथा व पिता नंदनसोबत विवाह लावत असल्याचे सांगून माधवाला समर्पित होण्यास प्रवृत्त करते पण ती एकदम मौन राहते. तिच्या मौनाने चारित्र आणखी उज्ज्वल भासते.

---

DO NOT COPY

## महावीरचरितम्चा परिचय–

भवभूतिच्या तीन नाटकापैकी रामकथेवर आधारित हे एक नाटक आहे. यातील कथेला भवभूति यांनी आपल्या कल्पना विलासाने नविन रूप प्रदान केले आहे. हे सात अंकाचे नाटक आहे. वीर रस व अद्भूत रसाचा परिपाक यात झालेला आहे. याचा नायक अर्थातच राम आहे. विश्वामित्राच्या यज्ञरक्षणापासून रावणवधानंतर रामचे अयोध्यागमन आणि राज्याभिषेकापर्यंतची कथा यात निरूपित आहे.

## कथावस्तू –

प्रथम अंकात मारीच, सुबाहु आणि ताडका सोबत राम व लक्ष्मणाचे युद्ध होते. विश्वामित्राच्या आश्रमात शिवधनुष्य प्रकट होतो. रामाव्दारा त्या शिवधनुष्याचा भंग केला जातो. सीता आणि उर्मिलाला ही कवी जनकाने याच अंकात अवतरित केले आहे. रावणाकडून सीतेचा हाथ मागण्यासाठी त्याचा दूत विश्वामित्राच्या आश्रमातच पोहचतो.

दुस–या अंकात रावणाचा मंत्री माल्यवानाचा शूर्पनखाशी संवाद होतो. त्यात तो आपली कुटनीति आणि गुप्त योजना शूर्पनखाला सांगतो. त्यानुसार तो परशुरामाला रामाशी युद्ध करण्यासाठी भडकावतो आणि शूर्पनखाला मंथराचा वेष धारण करून रामाच्या वनवासाचे षडयंत्र रचतो.

तिस–या व चौथ्या अंकात परशुरामाचा जनकाशी संवाद तसेच शतानंद, दशरथ आणि विश्वामित्रासोबत लांबलचक वाककलह आहे, ज्याची परिणिती राम व परशुराम युद्धात होते. यात परशुराम पराजित होतो. याचवेळी मंथरावेष धारण केलेली शूर्पनखा कैकयीचे पत्र दशरथाला देते ज्यानुसार रामाचा चौदा वर्ष वनवास आणि भरताला राज्य देण्याची मागणी केली आहे.

पाचव्या अंकात रावणाव्दारा सीताहरण, जटायु आणि रावणाचे युद्ध, विभिषणाची रामाशी भेट, सुग्रीव आणि रामाची मैत्री व बाली वध चित्रित आहे.



DO NOT COPY

सहाव्या अंकात राम आणि रावण युद्ध व त्यात रावणाचा वध वर्णित आहे. सातव्या अंकात सीतेच्या अग्नीपरीक्षेनंतर राम अयोध्येला येतात. विमानात बसलेल्या रामाच्या मुखातून कवीने लंकेपासून अयोध्यापर्यंतच्या प्रवासातील पृथ्वीवर दिसणा–या दृश्यांचे मनोरम वर्णन केले आहे. शेवटी रामाच्या राज्याभिषेकाने नाटक समाप्त होतो.

---

## पात्र परिचय

**राम–**

महावीरचरितम् नाटकाचा नायक महावीर राम आहे. महावीरचरितम् हे रामाच्या पूर्व चरित्रावर आधारित नाटक आहे. त्यामुळे यात रामाच्या राजकुमार रूपाचे चित्रण झाले आहे. येथे उच्च आदर्शाने युक्त पुरूष आहेत. युद्धरत असतानाही ते भावनावश न होता औचित्य व अनौचित्याचे भान ठेवतात. क्रोध व तामसिक गुणांचे दर्शन त्यांच्यात दिसून येत नाही. भवभूतिच्या अनुसार तिच वीरत श्रेष्ठ ज्यात अहंकाराला जागा नाही. तसेच त्यात सहानुभूती, विनम्रता व परोपकार इत्यादी गुण असावेत. या गुणांशिवाय असणारी वीरता व्यर्थ आहे. महाबली परशुरामाचे पौरूष्य ही रामाच्या विन्रमतायुक्त वीरतेपूढे कमी वाटते.

महावीरचरितम् मध्ये रामाचे रूप दैवी कमी व मानवीय जास्त वाटते. रामामध्ये नायकात असावे लागणारे सर्व गुण विद्यमान आहेत. ते उच्चकुलोत्पन्न, वीर, साहसी, गुणग्राही, भयरहीत आहेत. त्यांच्या कुळाच्या प्रतिष्ठेचे वर्णन कुशध्वज, वसिष्ठ व विश्वामित्राने केले आहे.

राम अलौकिक सौंदर्याने युक्त आहेत. जो त्यांना पाहता तो आकर्षित होतो. कुशध्वज त्यांना पाहून प्रभावित होतो. सीता सुद्धा प्रथम दर्शनात त्यांच्या सौम्य व सुंदर आकृतीला पाहून मुग्ध झाली होती. शत्रू पक्षातले परशुराम व बाली त्यांच्यावर प्रहार करायला चाचरतात.

रामाचा प्रभाव अलौकिक आहे. त्यांच्या प्रतापाने अहिल्येला मुक्ती मिळते. धनुर्भंगाच्या वेळी सर्वमाय सुद्धा त्यांच्या प्रभावाला पाहून आश्चर्यचकीत होतो. त्यांना ब्राह्मणावर आक्रमण करणा–या ताटका आणि यज्ञामध्ये विघ्न उपस्थित करणा–या राक्षसांचा वध केला. खर,



DO NOT COPY

दूषण, त्रिशला यांच्यासह चौदा सहस्त्र राक्षसांचा वध केला. परशुरामाचं दमन, बालीचा वध, रावणावर विजय हे सर्व त्यांच्या महावीरत्वाचे प्रमाण आहेत.

राम परगुणग्राही आणि सौजन्याने पूर्ण आहेत. जेव्हा लक्ष्मण रावणाच्या वीरतेवर आक्षेप घेतो तेव्हा राम मात्र त्याची प्रशंसा करतो. परशुरामाच्या वीरतेवरही राम प्रशंसा करतो. त्यांच्या गुरूजणाप्रती नम्रता आहे. त्यांचे भ्रातृप्रेमही उच्च कोटीचे आहे. विश्वामित्राने दिलेले जम्भकास्त्र ते लक्ष्मणासह स्विकार करतात. भरताच्या पुनर्मिलनाने त्यांचे हृदय आनंदित होते. ते नेहमी मर्यादा पालन करतात कोठेही शिष्टाचाराचे उल्लंघन करीत नाहीत. ते वीर, धर्मपालक, प्रभावी असण्यासोबतच साधारण मानवसुद्धा आहेत. मानवी भावभावनांचे दर्शन त्यांच्यात पाहायला मिळते.

## सीता

महावीरचरितम् नाटकाची नायिका सीता आहे. तिचे चरित्र कोमल भावनांनी भरलेले आहे. तिच्यामध्ये नारीसुलभ कोमलता व संकोच दिसून येतो. ती पतिव्रता, अकुटिल, सच्चरित्रा, सलज्जा व विनम्र आहे. रामाविषयी तिचा कोमल भाव प्रेमामध्ये परिवर्तीत होतो. शिवधनुर्भंगामूळे क्रोधीत परशूरामा व्दारा रामाला विचारल्यावर ती रामाला परशूरामाजवळ जाण्यापासून रोकते. सीतेचे रामाविषयी प्रेम वर्धीत होत असते.

महावीरचरितमची सीता रामाच्या सुखदुखाची अनुगामिनी आहे. तिला रामासोबत वनात जाण्याची परवानगी मिळताच ती प्रसन्न होते. ती आपल्यासाठी केलेल्या उपकाराची सदैव ऋणी राहते. तिच्यात उपकारी जटायुसाठी नेहमी श्रद्धाभाव असतो. तिच्या चरित्रामूळेच सातव्या अंकामध्ये देवतागण तिचे अभिनंदन करतात. नाट्यशास्त्रीय दृष्ट्या ती स्वकीया नायिका आहे.

---

●●●

DO NOT COPY

## उत्तररामचरितम् – भवभूति

### उत्तररामचरितम्चा परिचय–

भवभूतिच्या तीन नाटकापैकी सर्वात प्रसिद्ध नाटक म्हणून उत्तररामचरितम्कडे पाहिले जाते. केवळ संस्कृत साहित्यातच नाही तर विश्व साहित्यातील महत्वाच्या मोजक्या कलाकृतिमध्ये उत्तररामचरितम्चा समावेश होतो. हे रामायणावर आधारित नाटक आहे. यात एकूण सात अंक आहेत. रामाच्या राज्याभिषेकानंतर लोकापवादामुळे सीतेचा परित्याग व शेवटी सीतेशी पुनर्मिलनाचा वृतांत यात आहे. याला महावीरचरितमचा उत्तर भागही म्हटले जाते. नाटकाचा मुख्य रस करूण आहे.

### कथावस्तू –

नाटकाची सुरवातीला ऋष्यशृंग ऋषिच्या बारा वर्षाच्या यज्ञात वसिष्ठ, अरून्धती व रामाच्या माता अयोध्येला जातात. अष्टावक्र ऋषी संदेश घेऊन येतात की गर्भवती सीतेच्या मनोरंजनासाठी एक चित्रविथी बनविली आहे. त्यात त्यांच्या बाल्यकाळापासून रावणवध करून अयोध्येला वापस येईपर्यंतच्या चित्रांची श्रृंखला आहे.

पहिल्या अंकात कविने या चित्रविथीमध्ये आपल्या पात्रांना रमवत संपूर्ण रामकथेचे विहंगावलोकन करविले आहे. अग्निपरीक्षेच्या वेळी रामाची टिपण्णी मनाला व्याकूळ करून टाकते. कैकयीच्या वरदान मागण्याच्या प्रसंगाला सोडून पूढे निघून जाण्याने सीता प्रशंसेस प्राप्त होते. सीताहरणाच्या प्रसंगानंतर रामाच्या विरहव्यवस्थेचे चित्रण आणि रामाचे त्या भूतकाळाच्या स्मृतीत बुडून जाणे विषण्ण करते. सीता थकून रामाच्या कंध्याचा सहारा घेऊन झोपी जाते. याचवेळी दुर्मुख येऊन प्रजेमध्ये सीतेच्या परगृहवासदूषणाची चर्चा असल्याचे सांगतो. राम रडत रडत सीतेच्या परित्यागाचा निर्णय घेतात व सीतेला रथावर बसवून वनात सोडून येण्याचा आदेश देतात.

दुस–या अंकाचा आरंभ या घटनेच्या बारा वर्षानंतर पंचवटीमध्ये होतो. वनदेवी वासंती आणि तापसी आत्रयीच्या संवादातून सूचना मिळते की रामाने अश्वमेध चालू केला आहे. यज्ञामध्ये सीतेच्या ऐवजी तिची प्रतिमा ठेवण्यात येते. शूद्र तपस्वी शंबुकाचा वध करण्यासाठी राम पंचवटीत येत आहेत.

तिस–या अंकात तमसा व मुरला या दोन नद्या पात्र रूपात येतात. त्यांच्या बोलण्यावरून सूचना मिळते की रामाव्दारा त्यागलेल्या सीताने गंगा नदीत उडी मारली आहे पण गंगाने तिला वाचवले व तेथेच तिने दोन पुत्राला जन्म दिला. सीता गंगाच्या आदेशाने लव व कुश यांच्या बाराव्या जन्ममंगलग्रंथी निमित्त देवपूजनासाठी भूलोकात आली आहे. गंगाने तमसाला तिच्यासोबत राहण्याचा आदेश दिला आहे. गंगेच्या वरामुळे सीता अदृश्य राहते. तेथे आलेले राम पूर्वीच्या स्मृतीमुळे व्यथित होऊन सीतेचे स्मरण करून बेहोश होतात. अदृश सीतेच्या स्पर्शाने राम होशमध्ये येतात. भावनांच्या गहनतेमुळे 'छायांक' नावाचा हा अंक संस्कृत साहित्यात अप्रतिम आहे.

चौथ्या अंकात सीतेविना अयोध्येला जाण्यास अनुत्सूक असलेल्या कौसल्या इ. रामाच्या माता वाल्मिकीच्या आश्रमात येतात. तेथे त्या लव याला पाहतात पण ओळखत नाहीत. याच अंकात रामाच्या अश्वमेधातील अश्वाला लवने धरल्यामुळे रामाच्या सेनेसोबत युद्ध चालु होते.

पाचव्या अंकात लव आणि चंद्रकेतू यांच्यातील झटापट आणि लढाईचे वर्णन आहे.

सहाव्या अंकात विद्याधर व विद्याधरीच्या संवादात युद्धाचे वर्णन आहे. रामाच्या लव आणि कुश सोबत झालेल्या भेटीचे मार्मीक वर्णन कवीने केले आहे.

सातव्या अंकात वाल्मीकीव्दारा रचलेल्या रामायणाचे नाटक रूपात भरतमुनीकडून सादरीकरण होते. हे गर्भनाटक शेवटी वास्तविकतेत परिवर्तीत होऊ लागते. सीता खरोखर तिथे येऊन वाल्मिकीच्या सांगण्यावरून आपण निर्दोष असल्याची साक्ष्य देते. गंगा व धरणीमाता तिच्या पवित्रेची ग्वाही देतात. यासोबतच लव, कुश, सीता आणि राम यांच्या पुनर्मिलनाने नाटक समाप्त होतो.

---

**पात्र परिचय**

**राम–**

राम उत्तररामचरितम् या नाटकाचे नायक आहेत. त्यांना प्रामुख्याने राम किंवा रामभद्र नावाने संबोधले आहे. या नाटकामध्ये रामाला एक लोकप्रिय महाराजाच्या रूपाने चित्रित



DO NOT COPY

केले आहे. त्यांना कोठेही भगवान म्हटले नाही. ते एक मर्यादा पुरूषोत्तम आहेत. ते आदर्श राजा, आदर्श पती, आदर्श पिता आणि आदर्श भाऊ होते. त्यांचे चरित्र लोकोत्तर आहे. भवभूतिने रामाला आदर्श पतीपेक्षा आदर्श राजाच्या रूपात चित्रित केले आहे. रामाने लोकानुरंजनासाठी सीतेचा त्याग केला आहे. 'स्नेहं दयां च ..............आराधनाय लोकस्य मुन्चतो नास्ति मे व्यथा।' त्यांच्यासाठी राजाचे यश सर्वस्व आहे. त्यांच्या कुळाची परंपरा आहे की, ते प्रजापालक असावेत. महाराज दशरथानेही लोकाराधनासाठी रामाला आणि आपल्या प्राणांना सोडले होते.

रामाने या नाटकात एक आदर्श उपस्थित केला आहे की राजासाठी प्रजेचे हित आणि प्रजानुरंजन सर्वोत्तम कार्य आहे. प्रजानुरंजनासाठी त्यांच्या स्वतःच्या स्वातंत्र्याचाही बळी द्यावा लागतो. स्वतः इच्छा नसतानाही त्यांनी जनतेच्या संतोषासाठी सीतेचा परित्याग केला आणि त्यासाठी बारा वर्षे असह्य वियोग यातना सहन केल्या. शेवटी प्रजा व ऋषी मुनींच्या संमतीनेच सीतेचा स्वीकार केला. एक आदर्श पतीच्या रूपात त्यांचे जीवन अनुकरणीय आहे. त्यांनी सोन्याची सीतेची मूर्ती बनवून अश्वमेध यज्ञ केले. म्हणून वासन्तीचे वचन आहे की महापुरूषांचे हृदय वज्राहूनही कठोर व फुलाहूनही मऊ असते. आदर्श राजाच्या रूपात त्यांची कोणतीही कमी दिसून येत नाही. परन्तु आदर्श पतीच्या रूपात त्यांच्यावर अवश्य आक्षेप घेतला गेला. वासन्ती रामाला याबद्दल खूप बोलते ती म्हणते की यशासाठी तुम्ही एवढे मोठे पाप केले. काय तुम्हाला माहीत आहे का की स्त्री परित्याग केवढा मोठे अपयश होते. वनात सीतेचे काय झाले असेल? याचे उत्तर राम देउ शकले नाहीत. ते म्हणतात की नक्कीच सीतेला जंगली जनावरांनी खाल्ले असेल. राम बारा वर्ष हेच समजत राहीले की न सीता जिंवत आहे न तिला काही मुलं झाले. ते सीतेला निरापराध मानत होते पण तिच्या विषयी पसरलेला लोकापवाद त्यांना तिचा परित्याग करायला विवश करत होता. यासाठी त्यांनी जनतेलाच दोषी सांगितले.

राम सीतेच्या वियोगामुळे साक्षात करूणेची मूर्ती झाले होते. त्यांचे म्हणने होते की दुःख भोगन्यासाठीच माझ्यात चेतना शिल्लक राहिली आहे. शम्बूक वधानंतर जेव्हा ते पंचवटी व जनस्थानात जातात तेव्हा प्रत्येक पावला पावलाला जुन्या आठवणी काढतात. ते भावविव्हल, शोकाकुल व असहाय होतात. ते पुन्हा पुन्हा रडत आणि बेहोश होत. तमसाच्या



DO NOT COPY

सांगण्यावरून सीता आपल्या हस्तस्पर्शाने त्यांना होशमध्ये आणते. सीतेसाठी रामाचे प्रेम अगाध आहे. ते निरंतर सीतेचे स्मरण करत.

राम सर्व गुणांचे प्रतिमूर्ती आहेत आणि कर्तव्यपालनात कठोर आहेत. परन्तु अन्य बाबतीत ते तेवढेच मृदु आहेत. कुश आणि लव यांना पाहून आनंदित होतात. त्यांना हृदयाशी लावतात. त्यांच्यात वात्सल्याची भावना भरून वाहते. थोडक्यात राम आदर्श महापुरूषाच्या रूपात चित्रित करण्यात आले आहेत.

## सीता

सीता ही उत्तररामचरितम् या नाटकाची नायिका आहे. ती एक आदर्श सती साध्वी नारी आहे. शील, सदाचार व गुणांमध्ये ती अत्यंत उच्च आहे. तिच्या पावित्र्यासमोर अग्नीही तुच्छ आहे. अरून्धतीही तिला जगात पूजनीय असल्याचे सांगते. तिच्यात अलौकिक धैर्य आहे. याच धैर्याच्या आधाराने ती जिंवत राहते. खरे तर निरापराध आहे पण जनापवादामूळे तिला अपमानित, तिरस्कृत व निवार्सित व्हावे लागले. हे माहीत असनाही की रामाने तिचा अकारण त्याग केला ती केवळ मर्यादामुळे रामाला काहीही दोष देत नाही. ती लव व कुश यांचे दुध सुटल्यावर त्यांना वाल्मिकीजवळ सोडून पाताळात राहते. तिचे जिवन अत्यंत कारूण्यमय आहे. तिस–या अंकात तमसा तिला करूणेची मूर्ती व शरीरधारी विरहव्यथा म्हणते. ती अदृश्य होऊन राहत असताना बेहोश झालेल्या रामाला होशमध्ये आणते. तिला हे समजून आनंद होतो की परित्यागानंतर रामाने दूसरा विवाह केला नाही आणि अश्वमेध यज्ञात तिची सुवर्णमूर्तीने काम चालवले. रामाप्रति तिचे प्रेम अपार आहे. ती त्यांची नेहमी शुभचिंतक राहिली. तिच्या पुण्याईमुळेच नाटकाच्या शेवटी तिचे पती़शी पुनर्मिलन होते. मानव व देवतागण तिची प्रशंसा करतात व तिला निर्दोष असल्याचे सांगतात. ती एक आदर्श नारी आहे.

---

●●●

DO NOT COPY

## नाट्यशास्त्रीय परिभाषा

### 1 नांदी–

प्रत्येक नाटकाच्या सुरवातीला नांदी असते. हा आशीर्वादात्मक पद्य असतो जो नाटकाच्या आरंभापूर्वी सूत्रधार करतो. नांदीनंतरच नाटकाची सुरवात होते. आशीर्वचनसंयुक्ता स्तुतिर्यस्मात् प्रयुज्यते। देवव्दिजनृपादिनां तस्मान्नान्दीति संज्ञिता।। (सा.द. 6.24) अर्थात देवगण, ब्राह्मण आणि राजा इत्यादीची आशीर्वादयुक्त स्तुती ज्याव्दारा केली जाते त्याला नांदी म्हणतात.

'आशीर्नमस्क्रियारूपः श्लोकः काव्यार्थसूचकः। नान्दीति कथ्यते।' आदिभरत. आशीर्वाद आणि नमस्काराने युक्त श्लोकाला नांदी म्हणतात. त्यात काव्याच्या कथानकाचाही संकेत होतो. नांदीमध्ये असे म्हटले जाते की आठ किंवा दहा किंवा बारा पद असायला हवे.

### 2 सूत्रधार–

नाटकामध्ये सुरवातीला येऊन नाटकाची सुरवात करणारा व नाटकाचा शेवटही करणारा सूत्रधार असतो. तो नाटकाचे सर्व सूत्र हाथामध्ये धारण करतो म्हणून त्याला सूत्रधार म्हणतात. तो कधी नाटकाच्या मध्ये येऊन तर कधी पडद्यामागून नाटकाचे संचालन करतो. नाटकामध्ये सर्वप्रथम नांदी होते त्यानंतर हा सूत्रधार प्रवे़श करतो. त्याला सूचक, बीजदर्शक ही मानले जाते. याला सूत्रभृत, सूत्री आणि सूत्रकृत इत्यादी नावानेही संबोधले जाते. नाट्यशास्त्रामध्ये भरतमुनीने सूत्रधाराला भावयुक्त गीत, वाद्य आणि पाठ्यच्या सूत्राचे ज्ञाता आणि उपदेष्टा मानले आहे.

नाट्यस्य यद्नुष्ठानं तत् सूत्रं स्यात् सबीजकम्। रंगदैवतपूजाकृत् सूत्रधार इति स्मृतः। अर्थात बीजासोबत नाट्याच्या अनुष्ठानाला सूत्र म्हणतात. त्याला धारण करणारा व रंगमंचाच्या देवताची पूजा करणा–याला सूत्रधार म्हणतात. नाटकात पूढे होणा–या सर्व घटनांची सूचना रंगमंचावर येऊन सर्वप्रथम देणारा सूत्रधार असतो.

### 3 नेपथ्य –

नेपथ्य शब्दाचे तीन अर्थ होतात. एक वेष धारण करणे, दोन वेष धारण करण्याचे स्थान आणि तीन पडदा. अभिनेता जेथे नाटकासाठी आवश्यक रूप धारण करतो त्याला

DO NOT COPY

नेपथ्य म्हणतात. 'कुशीलवकुटुम्बस्य गृहं नेपथ्यमुच्यते।' आजकाल तर नेपथ्याला ग्रीन हाउसही म्हटले जाते. नाटकामध्ये रंगमंचावर येण्यापूर्वी पात्रांना आपल्या वेषभूषा सोबत रंग इत्यादी सौंदर्य प्रसाधनाचे काम करावे लागते. हे सर्व काम प्रेक्षकांना दिसायला नको असते. त्यामुळे ते ज्या पडद्याच्या मागे केले जायचे त्याला नेपथ्य म्हटले जात. याला जवनिका असाही शब्द वापरला जाई.

**4 अंकास्य–**

अंकान्तपात्रैरकांस्य छिन्नाकंस्यार्थसूचनाम्। अर्थात जर एखाद्या अंकाच्या शेवटी कोणत्यातरी पात्राव्दारा एखाद्या घटनेची किंवा वृत्ताची सूचना दिली जाते ज्यामुळे येणा–या अंकाचा आरंभ होतो तेव्हा त्याला अंकास्य किंवा अंकमुखम् म्हटले जाते. अंकाच्या शेवटी येणा–या पात्राला अंकपात्र म्हणतात. तो पात्र पूढे येणा–या कार्याची सूचना देतो आणि त्याप्रमाणे पूढील अंक सुरू होतो.

**5 विष्कंभक–**

नाटकात प्रवेशकाप्रमाणेच विष्कम्भकही महत्वाचा असतो. याला विष्कम्भ किंवा विष्कम्भक म्हटले जाते. याचा प्रयोग नाटकात संक्षेपाच्या उद्देशाने केला जातो. हा अंकाच्या सुरवातीलाच ठेवला जातो.

**भावी घटना–**

प्रवेशकाप्रमाणेच विष्कम्भकही 'भाविभूतार्थसूचनम्।' अर्थात भूतकाळातील आणि भावी घटनाची सूचना देतो. विष्कंभकाच्या कार्यामध्ये मुख्य पात्र येण्याची सूचना देणे हे तर असतेच त्याशिवाय मागे घडून गेलेल्या घटनांची माहिती देऊन पूढे घडणा–या घटनाची माहितीही दिली जाते. प्रवेशकाप्रमाणे विष्कंभकाचेही हे कार्य आहे.

**पात्र–**

नाटकामध्ये काही मुख्य व काही गौण किंवा निम्न पात्र असतात. त्यातील राजा, मंत्री, नायक, नायिका, राजकुमारी इत्यादी मुख्य पात्र तर दासी, व्दारपाल इत्यादी गौण किंवा निम्न पात्र असतात. जेथे विष्कम्भकात एक किंवा दोन मध्यम कोटीचे पात्र असतात,



DO NOT COPY

त्याला **शुद्ध विष्कम्भक** म्हणतात. आणि जर त्यामध्ये निम्न किंवा मध्यम कोटी पात्र असतील तर त्याला **मिश्र विष्कम्भक** म्हणतात.

**अंकारंभी –**

प्रवेशक हा दोन अंकाच्या मध्ये येतो. तर विष्कंम्भक हा अंकाच्या आरंभी प्रयुक्त होऊ शकतो. हा नाटकाच्या प्रारंभी प्रथम अंकात ही प्रयुक्त होऊ शकतो. प्रवेशक हा निम्न व हलक्या पात्राव्दारा करण्यात येत असल्याने प्रथम अंकात येत नाही.

**भाषा–**

संस्कृत नाटकामध्ये सामान्यात: उच्च व मुख्य पात्रेच संस्कृत संस्कृतभाषेत बोलतात. विष्कम्भकाची भाषा संस्कृत किंवा शौरसेनी प्राकृत असते. यात मध्यम पात्र असल्याने संस्कृतही बोलली जाते. प्रवेशकात मात्र निम्न पात्र असल्याने केवळ प्राकृत असते.

**6 प्रवेशक–**

आचार्य भरतमुनीने नाट्यशास्त्र नामक ग्रंथाची रचना केली. नाट्यशास्त्रीय दृष्ट्या नाटकामध्ये अनेक गोष्टीची आवश्यकता असते. त्यात प्रवेशकही महत्वाचा असतो. प्रवेशक शब्दाचा अर्थ प्रवेश करवणारा असा होतो.

**निम्न पात्र–**

नाटकामध्ये काही मुख्य व काही गौण किंवा निम्न पात्र असतात. त्यातील राजा, मंत्री, नायक, नायिका, राजकुमारी इत्यादी मुख्य पात्र प्रथम किंवा अचानक प्रवेश करीत नाहीत. ते प्रवेश करण्यापूर्वी त्यांच्या आगमणाची सूचना निम्न एक किंवा अनेक पात्राव्दारा दिली जाते. प्रवेशकात केवळ हलक्या दर्जाची पात्रे असतात. 'यन्नीचै: केवलं पात्रै।'

**भावी घटना–**

प्रवेशकाच्या कार्यामध्ये मुख्य पात्र येण्याची सूचना देणे हे तर असतेच त्याशिवाय मागे घडून गेलेल्या घटनांची माहिती देउन पूढे घडणा–या घटनाची माहितीही दिली जाते. 'भाविभूतार्थसूचनम्।' विष्कंभकाप्रमाणे प्रवेशकाचेही हे कार्य आहे.



DO NOT COPY

**अंकामध्ये –**

प्रवेशक हा दोन अंकाच्या मध्ये येतो. 'अंकयोरूभयोर्मध्ये स विज्ञेयः प्रवेशकः।' हा निम्न व हलक्या पात्राव्दारा करण्यात येत असल्याने प्रथम अंकात येत नाही. प्रथम अंकात शुभ समजून नांदी, मंगलाचरण इत्यादी असतात.


**भाषा–**

संस्कृत नाटकामध्ये सामान्यातः उच्च व मुख्य पात्रेच संस्कृत संस्कृतभाषेत बोलतात. प्रवेशक हा निम्न पात्राव्दारा करावयाचा असल्याने प्राकृत भाषेत केला जातो. जसे 'प्राकृतभाषां च भाषन्ते।'

**7 पताका–**

संस्कृच्या नाट्यशास्त्रीय ग्रंथामध्ये कथावस्तू व त्यांचे भेद विस्तृतपणे सांगण्यात आले आहेत. आचार्य भरतमुनीचे नाट्यशास्त्र, धनंजयाचे दशरूपक इत्यादी ग्रंथामध्ये यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. कथावस्तुला वस्तु, इतिवृत्त इत्यादीही म्हटले जाते.

इतिवृत्त किंवा कथावस्तुचे आधिकारिक आणि प्रासंगिक असे दोन मुख्य प्रकार आहेत. पुन्हा प्रासंगिक कथावस्तुचे प्रताका व प्रकरी असे उपभेद पडतात.




**व्याख्या–**

'व्यापी प्रासंगिकं वृत्तं पताकेत्यभिधीयते।' अर्थात प्रासंगिक कथेसोबत दूरवर जाणा–या वृत्ताला पताका म्हणतात. मुख्य कथावस्तु म्हणजे अधिकारीक वस्तु. त्याला पोषक असणा–या व मध्येच चालू झालेल्या कथेला प्रासंगिक कथा म्हणतात. या प्रासंगिक कथेत त्याचे फळ मिळेपर्यंत दूरवर चालणा–या कथेला पताका म्हणतात.

DO NOT COPY

आचार्य भरतानुसार आधिकारीक वृत्ताचा उपकारक जे वृत्त पदार्थ असतो आणि सोबतच स्वतःचेही प्रयोजन सिद्ध करतो त्याला पताका म्हणतात. 'सा पताका इति कीर्तिता।' नाट्यशास्त्र 19.24

आचार्य भरताच्या निर्देशानुसार पताका गर्भसंधी किंवा जास्तीत जास्त विमर्श संधीपर्यत समाप्त व्हायला पाहिजे.

**8 चूलिका–**

संस्कृत नाटकामध्ये नाट्यशास्त्रीय दृष्ट्या काही अर्थोपक्षेपक खूप महत्वाचे मानले जातात. अभिनयाच्या दृष्टीने नाटकाच्या कथावस्तुचे दोन भाग आहेत. 'एक वाच्य आणि दुसरा सूच्य' ज्या कथावस्तुमध्ये काही भाग नीरस असतो किवा त्याचे रंगमंचावर सादरीकरण करता येत नाही अशा गोष्टीची केवळ सूचना दिली जाते. यासाठी चूलिका महत्वाची आहे.

'अन्तर्जवनिकासंस्थैश्चूलिकार्थस्य सूचना।' अर्थात जेथे पडद्याच्या मागून पात्राच्या प्रवेशाची सूचना दिली जाते तेथे चूलिका नावाचा अर्थोपक्षेपक होतो. जवनिका म्हणते पडदा. पडद्याच्या पाठीमागून पात्राव्दारा कोणत्यातरी अर्थाची किंवा घटनाची सूचना दिली जाते तेव्हा त्याला चूलिका म्हणतात.

**9 भरतवाक्य–**

संस्कृत नाटकाचा प्रारभ नाट्यशास्त्रीय दृष्टीने मंगलाचरणाने होतो व नाटकाचा शेवट हा भरतवाक्यानेच होत असतो. भरतवाक्य झाल्यावर नाटक समाप्त झाल्याचे सूचित होते.

प्रस्तावनानन्तरं नटवाक्याभावादत्र भरतवाक्यमित्युक्तिः। अर्थात प्रस्तावना झाल्यानंतर नाटकाच्या शेवटी नटवाक्य अभावात म्हणजे काहीही संवाद नसल्यानंतर जे सामाजिकांना म्हटले जाते ते भरतवाक्य होय. असे राघवभट्टाचे स्पष्टीकरण आहे.



DO NOT COPY

आशीर्वादात्मक–

भरतवाक्य हे नेहमी आशीर्वाद सूचक असते. यात प्रेक्षकांना किंवा नाटकातील नायक इत्यादींना आशीर्वाद दिला जातो. राघवभट्टाच्या मते भरत म्हणजे नट व नटाचे वाक्य भरतवाक्य. काहींच्या मते नाट्यशास्त्रकार भरतमुनीच्या गौरवार्थ शेवटी दिलेला आशीष भरतवाक्य असते.

---

●●●

DO NOT COPY

| अक | नाटके |
|---|---|
| 1 | कर्णभारम्– भास |
| 2 | स्वप्नवासवदत्तम्– भास |
| 3 | मालविकाग्निमित्रम–कालिदास |
| 4 | विक्रमोर्वशीयम्–कालिदास |
| 5 | अभिज्ञानशाकुन्तलम –कालिदास |
| 6 | मृच्छकटिकम्–शूद्रक |
| 7 | मुद्राराक्षसम्– विशाखादत्तम् |
| 8 | वेणीसंहार– भट्टनारायण |
| 9 | रत्नावली– हर्षवर्धन |
| 10 | मालतिमाधवम्–भवभूति |
| 11 | महावीरचरितम्–भवभूति |
| 12 | उत्तररामचरितम्–भवभूति |
| 13 | नाट्यशास्त्रीय परिभाषा |

ISBN NO.- 978-81-939485-3-8